रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक २४०
www.ramprahar.com
# राम प्रहर
सोमवार, १८ मार्च २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची नवीन कार्यकारिणी जाहीर

**नागपूर :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पार पडलेल्या तीनदिवसीय अखिल भारतीय प्रतिनिधी सभेत नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. सरकार्यवाहपदी नियुक्त दत्तात्रेय होसबळे यांनी २०२४-२७ या कालावधीसाठी सहा सहसरकार्यवाहांची नियुक्ती केली. यामध्ये कृष्ण गोपाल, मुकुंद, अरुण कुमार, रामदत्त चक्रधर, अतुल लिमये आणि आलोक कुमार यांचा समावेश आहे. अतुल लिमये आणि आलोक कुमार अशी दोन नवीन सहसरकार्यवाह यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आता पाचऐवजी आता सहा सहसरकार्यवाह (सहसचिव) करण्यात आले आहेत. मनमोहन वैद्य यांना सहसरकार्यवाह पदावरून मुक्त करण्यात आले आहे. अतुल लिमये हे महाराष्ट्र कार्यक्षेत्र, पश्चिम विभागाचे क्षेत्र प्रचारक होते, तर आलोक कुमार राष्ट्रीय सह-प्रचार प्रमुख पदावर कार्यरत आहेत. त्यापूर्वी ते पश्चिम उत्तर प्रदेशचे प्रचारक होते.

## अंतरंग

पाकमधील १८ हिंदू निर्वासितांना मिळाले भारतीय नागरिकत्व/२
रायगड लोकसभा मतदारसंघाचा निकाल महिलांच्या हाती!/५
कुमार गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राची बाद फेरीत धडक/८

# ठाकरे गटाला जोरदार धक्का

## आमदार आमश्या पाडवी यांचा शिवसेनेत प्रवेश

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीची घोषणा होताच माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना मोठा धक्का बसला आहे. ठाकरे गटाचे विधान परिषदेचे आमदार आमश्या पाडवी यांनी समर्थकांसह रविवारी (दि.१७) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

या वेळी आपली भूमिका मांडताना नंदुरबार येथील आमदार पाडवी म्हणाले की, पक्ष एकत्र असताना माझी निवड झाली. पक्षात काम करीत असताना दोनवेळा मला शिवसेनेतून उमेदवारी मिळाली. ज्या भागात मी काम करतो तिथला विचार केला तर पाहिजे तसा विकास झालेला नाही. माझ्या सहकाऱ्यांनी मला दादा तुम्ही आमदार



झाले, पण आपल्या भागातील कामे प्रलंबित आहेत. त्यामुळे ज्यांनी तुम्हाला आमदार केले त्यांच्यासोबत जायला पाहिजे असे सांगितले. शिवाय काँग्रेसच्या उमेदवाराचा प्रचार कसा करायचा? म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विश्वास ठेवून पदाधिकाऱ्यांसह मी पक्षप्रवेश केला, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### लग्न एकाबरोबर, संसार दुसऱ्यासोबत हे राजकारणात चालत नाही -मुख्यमंत्री

ज्यांच्याविरुद्ध आम्ही अनेक वर्ष लढलो, त्यांच्यासोबत काम कसे करायचे? २०१९मध्ये शिवसेना-भाजप एकत्र निवडणूक लढलो. बाळासाहेब ठाकरे-नरेंद्र मोदी असे फोटो लावून लोकसभा, विधानसभा लढवल्या, पण निकालानंतर सर्व दरवाजे उघडे आहेत असे प्रमुख म्हणायला लागले. त्याचदिवशी महाराष्ट्राला जाणीव झाली दाल मै कुछ काला है. लग्न एकाबरोबर आणि संसार दुसऱ्यासोबत हे राजकारणात चालत नाही, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हणत उद्धव ठाकरेंना टोला लगावला.

# सुप्रिया सुळेंमुळे राष्ट्रवादीमध्ये आणि आदित्य ठाकरेंमुळे शिवसेनेत फूट पडली

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दावा

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी आणि शिवसेनेत फूट का पडली? राष्ट्रवादी काँग्रेस फुटण्याचे कारण काय? तर अजित पवार यांना राजकीय वारसदार म्हणून आधी पुढे आणले आणि नंतर वरिष्ठांना वाटले की पुतण्याऐवजी मुलीकडे पक्ष जायला हवा. हेच शिवसेनेतही झाले. उद्धव ठाकरेंना वाटले पक्ष किंवा राजकारणात आदित्य ठाकरेंना पुढे आणले पाहिजे. त्याच अनुषंगाने त्यांनी राजकारणात वाटाघाटी सुरू केल्या. यासाठी त्यांनी आपली मूळ विचारधारा सोडून दुसऱ्या विचारधारेला स्वीकारले. त्यामुळे त्यांच्या पक्षात फूट पडली, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

'काँग्रेस न होती तो क्या होता' या पुस्तकाचे प्रकाशन रविवारी (दि.१७) उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी दिलेल्या मुलाखतीमध्ये त्यांनी शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या राजकारणावर भाष्य केले.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आपल्या देशात अनेक राजकीय पक्ष तयार झाले. या पक्षांनी काँग्रेसच्या राजकारणाची शैली स्वीकारली. काँग्रेसने पैशांच्या जोरावर राजकारण करण्याचा पायंडा पाडला, मात्र भाजप हा एकमेव पक्ष होता, ज्याने काँग्रेसच्या विचारधारेला, त्यांच्या राजकारणाच्या शैलीला नाकारले आणि स्वतंत्र शैली विकसित केली. आज इतर राजकीय पक्षही हळूहळू स्वतःमध्ये बदल करीत आहेत. भाजपच्या पावलांवर पाऊल टाकत इतर राजकीय पक्ष स्वतःमध्ये बदल करीत आहेत.

भाजपने घराणेशाहीच्या राजकारणाला विरोध केला असला तरी कुणालाही राजकारणात येण्यापासून रोखलेले नाही. जर राजकीय नेत्यांच्या पुढच्या पिढीला राजकारणात यायचे असेल तर त्यांनी जरूर यावे, पण स्वतःच्या ताकदीवर यावे. ज्याच्यात क्षमता आहे, तो स्वतःच्या हिमतीवर पुढे जाईल अशा प्रकारच्या राजकारणाच्या दिशेने आम्ही चाललो आहोत, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.




### पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात देश बलशाली

मुंबईत झालेला हल्ला एकट्या मुंबईवर हल्ला नव्हता, तर देशाच्या सार्वभौमत्वावर हल्ला होता. आर्थिक केंद्रावर हल्ला केला गेला होता. भारत काहीच नाही हे दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. भारताने काय केले तर अमेरिकेकडे धाव घेतली, पण अमेरिकेने काहीच मदत केली नाही. एक कमकुवत सरकार आपल्याला पहायला मिळाले, असे सांगून उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आज पाकिस्तान सोडा चीनदेखील आपल्या डोळ्यात डोळे घालून पाहू शकत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात देश बलशाली झाला आहे. आपण सर्जिकल स्ट्राईक करून जशास तसे उत्तर देण्यात आले. भारत आता पूर्वीसारखा कमजोर देश राहिला नाही हे सर्व जगाला कळाले.

# पुण्यात 'एनआयए'ची मोठी कारवाई

## दहशतवादी कारवायांसाठी वापरलेली इमारत जप्त

**पुणे : प्रतिनिधी**

मुंबई, पुण्यासह गुजरातमधील महत्त्वाच्या शहरांत बॉम्बस्फोट घडविण्याच्या तयारीत असलेल्या आयसिस संघटनेच्या दहशतवाद्यांनी पुण्यातील कोंढवा येथे बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण घेतल्याचे उघड झाले. त्यानंतर राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) दहशतवादी वास्तव्यास असलेली इमारत जप्त केली आहे.

एनआयएने मोहम्मद आलमला कोथरूड परिसरात दुचाकी चोरताना




पोलिसांनी पकडले होते. तपासासाठी त्याला कोंढव्यात नेण्यात आले तेव्हा तो पसार झाला होता. २ नोव्हेंबर २०२३ रोजी दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने त्याला पकडले. त्यानंतर त्याला तपासासाठी एनआयएच्या ताब्यात देण्यात आले. दहशतवाद्यांनी सातारा जिल्ह्यातील एका वस्त्रदालनात दरोडा टाकून बॉम्बस्फोटाचे साहित्य खरेदी केले होते, तर कोंढव्यात त्यांनी बॉम्ब कसा तयार करायचा याबाबतचे प्रशिक्षण घेतले. कोल्हापूर, सातारा परिसरातील जंगलात त्यांनी नियंत्रित पद्धतीने बॉम्बस्फोट केले होते. त्यांनी शस्त्र चालविण्याचे प्रशिक्षण घेतल्याचेही तपासात उघड झाले आहे.

## आता प्रत्येक शाळेत महाराष्ट्र राज्यगीत निनादणार

**मुंबई : प्रतिनिधी**

जय जय महाराष्ट्र माझा... हे गीत राज्यगीत आता प्रत्येक शैक्षणिक संस्थेत वाजवले जाणार आहे. सरकारने याबाबत परिपत्रक काढले आहे.

या परिपत्रकानुसार राज्यातील शाळांमध्ये दैनिक सत्र सुरू होण्यापूर्वी राष्ट्रगीत, परिपाठ, प्रार्थना, प्रतिज्ञा यासोबत राज्यगीत वाजविले-गायले जाईल, अशी सूचना करण्यात आलेली आहे. याची दक्षता शाळा व्यवस्थापनाने घ्यावी. वरील सूचनांचे पालन राज्यातील सर्व शाळा व्यवस्थापन करतील याबाबतची दक्षता सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी घ्यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

## निवडक

### महादेव बेटिंग ॲपप्रकरणी भूपेश बघेलांविरोधात गुन्हा

**रांची :** छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांच्या अडचणी वाढताना दिसत आहेत. महादेव बेटिंग ॲपप्रकरणी त्यांच्याविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. ऑनलाइन सट्टेबाजीसाठी डिझाइन केलेले हे ॲप आहे. बघेल यांच्यासह या बेटिंग ॲपचा प्रमोटर सौरभ चंद्राकर आणि रवि उप्पल यांच्यासह १७ इतर लोकांचीही एफआयआरमध्ये नावे आहेत.

### अरुणाचल, सिक्कीम विधानसभा निवडणूक निकाल तारखेत बदल

**नवी दिल्ली :** केंद्रीय निवडणूक आयोगाने शनिवारी लोकसभेबरोबरच चार राज्यांतील विधानसभा निवडणुकांच्या तारखाही जाहीर केल्या आहेत. दरम्यान, यातील अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीची तारीख ४ जूनऐवजी आता दोन दिवस आधी घेत २ जून करण्यात आली आहे. बाकी निवडणूक कार्यक्रम पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार होणार आहे.

# एक धाव आरोग्यासाठी...!

## खांदा कॉलनीतील मॅरेथॉनला महिलांचा उत्तम प्रतिसाद | आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखवला हिरवा झेंडा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्व. संजय दिनकर भोपी यांच्या स्मरणार्थ आनंदी ग्रुप अंतर्गत संजय भोपी स्पेशल क्लब, मॉर्निंग योग ग्रुप, अलर्ट सिटीझन फोरम, खांदा कॉलनी बॅडमिंटन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून एक धाव आरोग्यासाठी ही महिला मॅरेथॉन रविवारी (दि.१७) आयोजित करण्यात आली होती. खांदा कॉलनीतील महात्मा स्कूल ग्राउंड येथे झालेल्या या स्पर्धेला भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी झेंडा दाखवून सुरुवात केली.

दरवर्षी ८ मार्च हा दिवस जगभरात जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने विविध उपक्रमांद्वारे महिलांचा सन्मान करून त्यांच्या सशक्तीकरणाचा प्रयत्न केला जातो. यालाच अनुसरून खांदा कॉलनीत महिला मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपक्रमास शुभेच्छा आणि महिलांना प्रोत्साहन दिले.

स्पर्धेवेळी भाजप ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, भाजप खांदा कॉलनी सरचिटणीस भीमराव पोवार, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस अभिषेक भोपी, अर्चना ठोंबरे, सामाजिक कार्यकर्त्या वंदना बावसर, डॉ. शीतल कांडपिळे, संजय पाटील, प्रसन्न, डॉ. मोतिलिंग, प्रेमा भोपी, जयंती प्रसन्न, मिता कपाडिया यांच्यासह इतर मान्यवर, पदाधिकारी उपस्थित होते. या मॅरेथॉनला महिलांचा उत्तम प्रतिसाद लाभला.




# पंतप्रधान मोदींना परदेशातूनही पाठिंबा

## समर्थनासाठी लंडनमध्ये निघाली भव्य कार रॅली

**लंडन : वृत्तसंस्था**

देशात लोकसभेची निवडणूक जाहीर झाली आहे. निवडणूक लागताच सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे, तर भारताबाहेरही निवडणुकीच्या तयारीला वेग आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षाला पाठिंबा दर्शवण्यासाठी लंडनमध्ये एका कार रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. भाजपच्या युकेतील ओव्हरसीज फ्रेंड्सने या कार रॅलीतून आपला पाठिंबा दर्शविला.



या रॅलीची सुरुवात नॉर्थॉल्ट येथील कच्छ लेवा पाटीदार समाज संकुलापासून झाली आणि नियाडेन येथील स्वामीनारायण मंदिर या ठिकाणी समारोप झाला. देशातील सार्वत्रिक निवडणुकांपूर्वी भाजप आणि पंतप्रधान मोदींना मोठ्या प्रमाणावर पाठिंबा दर्शवणाऱ्या या रॅलीमध्ये २५०हून अधिक कार सहभागी झाल्या होत्या. रॅलीत सहभाग घेतलेल्या ब्रिटनमधील सदस्यांनी भारतीय तिरंगा तसेच भाजपचे झेंडे हातात घेतले होते.

रॅलीमध्ये भाग घेऊन यूकेचे संसदपटू आणि पद्मश्री बॉब ब्लॅकमन यांनी कार रॅली लंडनमधील स्वामीनारायण मंदिरात संपल्यानंतर भारतीय समुदायाच्या सदस्यांना संबोधित केले. त्यांनी या निवडणुकीत भाजप ४००पेक्षा जास्त बहुमतासह विजयी होईल, असा विश्वास व्यक्त केला.


## गुडघे - मणके - फ्रोझन शोल्डर, लकवा, ॲलर्जी, ॲसिडिटीवर विनाऔषध विनाऑपरेशन उपचार

ॲक्युपंक्चरद्वारे अतिसूक्ष्म सुया टोचून शरीरातील विविध प्रेशर पॉइंट्सना उत्तेजित करून मांसपेशीतील ताकद वाढणे, मेंदूच्या कमकुवत भागास चालना मिळणे, प्रतिकारशक्ती वाढणे, सांध्यातील सूज कमी होणे, स्लिप डिस्कची सूज घालवणे, कमकुवत चेतनातंतू पुन्हा कार्यरत होणे, प्रतिकारशक्ती वाढणे, यासारखे सकारात्मक परिणाम दिसून येतात व उपरोक्त आजार बरे होऊ शकतात. उपचारासाठी रुग्णांना महिन्यातून 5 किंवा 10 वेळा यावे लागते. अनेक रुग्णांना काही सिटिंग्स मध्ये देखील सकारात्मक परिणाम दिसून येतात, यामुळे त्यांचा उत्साह वाढतो.

**रुग्णांचे अनुभव**

**गुडघे** - डाव्या गुडघेदुखीचा त्रास असणाऱ्या महिलेस प्रत्यारोपण सांगितले होते. प्रत्यारोपणाशिवाय ॲक्युपंक्चरच्या 20 सिटिंग्स मध्येच दुखणे बरे होऊन मार्केटमध्ये जाणेही शक्य झाले.

**मणके** - L 4 - 5 कॅनल स्टेनोसिसचा रुग्ण 4 महिने बेडरेस्टवर होता, ऑपरेशन टाळण्यासाठी ॲक्युपंक्चर घेतले व 10 दिवसांतच बरा झाला. ट्रेनचा प्रवास करणे, चालणे, वाकणे सहज शक्य झाले.

**फ्रोझन शोल्डर** - फ्रोझन शोल्डरमुळे हाताची हालचाल करता येत नसल्याने महिलेस रोजची कामे, साडी नेसणे अशक्य झाले होते. 15 सिटिंग्स मध्येच हात मागे-पुढे फिरवणे शक्य झाल्याने दैनंदिन कामे, साडी नेसणे शक्य झाले.

**लकवा** - लकवा झालेल्या महिलेस चपात्या लाटणे, वस्तू उचलणे, चालणे कठीण झाले होते. महिन्याभराच्या उपचारात हात-पायात ताकद आल्याने दैनंदिन क्रिया करणे, न थकता चालणे शक्य झाले.

**ॲलर्जी** - फळा-फुलांच्या सुगंधाने मळमळणे, उलटी होणाऱ्या रुग्णाची 27 वर्ष जुनाट ॲलर्जी आणि सर्दी दीड महिन्यांच्या उपचारातच पूर्णपणे गेली.

**ॲसिडिटी** - 6 वर्षांपासून ॲसिडिटी असलेल्या रुग्णास अपचन, लाल चट्टे, आंबट पाणी यायचे. 20 सिटिंग्स मध्येच सर्व त्रास बंद झाले.

रुग्ण प्रकृतीप्रमाणे येणारे गुण निराळे असू शकतात.

**'डॉ. लोहिया ॲक्युपंक्चर'** येथे मुलत : ॲलोपॅथीतज्ज्ञ तपासणी करतात. डिस्पोजेबल सुया, ॲक्युपंक्चर सेट वापरल्याने उपचार नेहमीच सुरक्षित आणि आरोग्यदायी ठरतात.

दादर (प) – प्लाझा सर्कल – ७७१८८७६१०१,
ठाणे (प) - गांवदेवी – ७७१८८७६१०२,
अंधेरी (पू)-कोर्टामागे- ७७१८८७६१००,
पनवेल - आदर्श हॉटेल - ७७१८८७६०९९,
वाशी - सेक्टर-4, बस डेपोसमोर -७७००९०५५५०

अधिक माहितीसाठी Youtube वर dr. lohiya search करा व रुग्णांचे अभिप्राय व डॉ लोहिया यांच्या मुलाखती अवश्य पहा.

(Advt.)


# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये प्री प्रायमरी ग्रॅज्युएशन डे उत्साहात साजरा







**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये शनिवारी (दि.१६) प्री प्रायमरी ग्रॅज्युएशन डे उत्साहात साजरा झाला. या वेळी शकुंतला रामशेठ ठाकूर आणि अर्चना परेश ठाकूर या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थितांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली. यानंतर विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. पाहुण्यांचे स्वागत मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांनी केले. ज्युनिअर केजीतील सान्वी डोलकर हिने स्वागताचे छान भाषण सादर केले. यानंतर विद्यार्थ्यांनी सुंदर नृत्य पेश केले. यामध्ये त्यांनी भविष्यात आपल्याला काय व्हायचे आहे हे वेगवेगळ्या वेशभूषा व भूमिकांद्वारे सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

या वेळी प्रमुख पाहुण्या अर्चना ठाकूर यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन केले तसेच मुलांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांनीही मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.

## होळीसाठी मध्य रेल्वेच्या आणखी १२ स्पेशल गाड्या

**मुंबई :** होळीचा सण जवळ येऊन ठेपला आहे. यासाठी कोकणवासीयांची गावी जाण्याची लगबगदेखील सुरू झाली आहे. अशातच होळीसाठी गावी जाणाऱ्या नागरिकांसाठी मध्य रेल्वेने आणखी एकदा आनंदाची बातमी दिली आहे. मध्य रेल्वेने यापूर्वी विविध मार्गांवर होळी स्पेशल ११२ ट्रेन सुरू करण्याची घोषणा केली होती. त्यात आणखी १२ होळी विशेष ट्रेन चालविण्याचा निर्णय घेतला आहे.

अनेकजण आपापल्या गावी जाऊन नातेवाईक आणि मित्रमंडळींसोबत विविध सणांचा आनंद लुटण्याचा बेत आखतात, मात्र लांबपल्ल्याचा प्रवास व त्यातच ट्रेनला असणार गर्दी पाहता ट्रेनचे आरक्षण मिळणे कठीण होऊन जाते. ट्रेनने लांबपल्ल्याचा प्रवास हा सर्वसामान्यांना परवडणारा असतो. म्हणून गणेशोत्सव असो किंवा होळीचा सण कोकणवासीयांची पहिली पसंती ट्रेनला असते. याचदरम्यान कोकणात जाणाऱ्यांची गर्दी पाहता मध्य रेल्वेने आणखी १२ होळी स्पेशल ट्रेन चालविण्याचा निर्णय घेतला आहे.

# आदर्श आचारसंहितेची प्रभावी व काटेकोर अंमलबजावणी करा

## रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे निर्देश



**रायगड : प्रतिनिधी**

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या परिसरात निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आदर्श आचारसंहितेची प्रभावी व काटेकोर अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत.

आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात रविवारी (दि.१७) आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री जावळे म्हणाले, रायगड मतदारसंघासाठी तिसऱ्या टप्प्यात म्हणजे ७ मे रोजी मतदान होणार आहे. जिल्ह्यात लोकसभा निवडणूक आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी शासकीय-निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आलेले भित्तीपत्रक, झेंडे, कटआऊंट्स, संदेश काढून त्याचा अहवाल २४ तासांत सादर करावा. भिंतीवरील रंगविलेल्या जाहिरातीदेखील काढण्यात याव्यात.

शासकीय मैदाने, रस्ते, उद्याने, विद्युत खांब, खासगी मालमत्तेवर परवानगी न घेता लावलेले भित्तीपत्रक किंवा संदेशही ४८ तासांत काढण्यात यावेत. परवानगी न घेता खासगी मालमत्तेवर जाहिरात केली असल्यास गुन्हे दाखल करण्यात यावेत. सर्वांनी काटेकोरपणे निवडणूक आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी करावी. सी-व्हिजील ॲपवर आलेल्या तक्रारींसंदर्भात तातडीने कार्यवाही करावी, असेही निर्देश जावळे यांनी दिले.

मतदान केंद्रांवरील सुविधा विशेषत: पाणी, वीज, स्वच्छतागृहे, दिव्यांग मतदारांसाठी रॅम्प याचेही आतापासून नियोजन करा. सर्व संबंधित यंत्रणांनी मतदान केंद्रांना भेटी देऊन पाहणी करावी आणि आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा तयार करून घ्याव्यात तसेच भरारी पथक सक्रीय ठेवा. आचारसंहिता काळात नवीन विकासकामांना परवानगी देता येणार नाही, नवीन कामांना सुरुवात करता येणार नाही. सद्यस्थितीत सुरू असलेली कामे नियमितपणे सुरू ठेवायची आहेत, असेही जावळे यांनी स्पष्ट केले.

निश्चित केलेल्या सभा ठिकाणी सर्व राजकीय पक्षांना सभा घेण्याची समान संधी देण्याबाबत संबंधित यंत्रणेमार्फत कार्यवाही करण्यात यावी. शासकीय विश्रामगृहांचा वापर राजकीय कारणासाठी अथवा प्रचार, सभा, मेळावे यासाठी होणार नाही याची सर्वांनी दक्षता घ्यावी. शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी असलेल्या नियमांचे सर्वांनी पालन करावे. कुणीही राजकीय प्रचारात सहभागी होऊ नये, अशा सूचना त्यांनी या वेळी दिल्या. निवडणूक ही सामुहिक जबाबदारी आहे. सर्वांनी आपल्या कर्तव्याचे आणि जबाबदारीचे पालन करावे, असे निर्देशही त्यांनी दिले.

या बैठकीला सर्व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस अधिकारी तसेच सर्व नोडल अधिकारी आणि विभाग प्रमुख उपस्थित होते.

### मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी नियोजन करा

मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी प्रत्येकाने 'स्वीप'चे आतापासूनच नियोजन करावे. त्या दृष्टीने काही वेगळे अनोखे उपक्रम राबवावेत. सर्व समाज घटकांचा यामध्ये सहभाग घ्यावा. त्यांच्यामध्ये जनजागृती करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी या वेळी दिले.

# शिवसैनिकांसाठी काळा दिवस!

## इंडिया आघाडीच्या मुंबईतील सभेवरून मुख्यमंत्र्यांचे टीकास्त्र



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील छत्रपती शिवाजी पार्क मैदानात इंडिया आघाडीची रविवारी (दि.१७) सभा झाली. यावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना लक्ष्य केले.

काँग्रेसची गेल्या ६३ दिवसांपासून सुरू असलेली भारत जोडो न्याय यात्रा शनिवारी मुंबईत पोहचली, तर रविवारी दादरमधील शिवाजी पार्कवर इंडिया आघाडीची जाहीर सभा झाली.

या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आजचा दिवस शिवसैनिकांसाठी काळा दिवस आहे, कारण जे शिवतीर्थ... ज्या शिवाजी पार्कवरून बाळासाहेब ठाकरे यांनी संपूर्ण देशाला मार्गदर्शन केले. याच ऐतिहासिक मैदानात ज्यांनी स्वातंत्र्यवीर सावकर यांच्यावर आरोप केले त्यांच्यासोबत सभा घेण्याची वेळ आली आहे हे दुर्दैवच आहे. आज 'गर्व से कहो हम हिंदू है' हे कसे बोलणार... हादेखील प्रश्न आहे.

मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, हिंदूहृदयसम्राट बोलायलापण काही लोक घाबरत आहेत. त्यामुळे मला वाटते की, बाळासाहेबांची विचारधारा सोडणाऱ्यांना जनता चांगलाच धडा शिकवेल. आज आमदार आमश्या पाडवी आणि त्यांचे हजारो कार्यकर्ते बाळासाहेबांच्या विचारधारेच्या शिवसेनेत आले आहेत. इथे बाळासाहेबांचे विचार आणि तिकडे बाळासाहेबांच्या विचारांना तिलांजली देणारी लोकं आहेत.

### राहुल गांधींसमोर शरणागत होणार का?

*भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही बाळासाहेब ठाकरेंचा एक व्हिडीओ शेअर करीत उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे. शिवसेनेची काँग्रेस होऊ देणार नाही, त्यापेक्षा माझे दुकान बंद करेन, अशा आशयाचा बाळासाहेब ठाकरेंचा जुना व्हिडीओ बावनकुळेंकडून ट्विट करण्यात आला आहे. उद्धव ठाकरे शिवतीर्थावर जाऊन राहुल गांधींसमोर शरणागत होणार का? बाळासाहेबांच्या स्मारकाला राहुल गांधी अभिवादन करतील का? असा सवालदेखील त्यांनी उपस्थित केला आहे.*

# पुरणपोळीचा गोडवा महागला




**मुंबई : प्रतिनिधी**

होळीचा सण काही दिवसांवर आला आहे. होळीच्या दिवशी महाराष्ट्रात आवर्जून पुरणपोळी हा गोड पदार्थ तयार केला जातो, मात्र यंदा जिन्नसांच्या किमतींमध्ये वाढ झाल्याने पुरणपोळी महाग झाली आहे.

महाराष्ट्रीयन खाद्यसंस्कृतीमध्ये पुरणपोळीला महत्त्वाचे स्थान आहे. अनेक सणांमध्ये पुरणपोळी ही केलीच जाते. त्यात होळीला आवर्जून असते. पुरणपोळी बनवण्याचे कामही अवघड आणि वेळखाऊ असते.

नोकरी करणाऱ्या महिलांना यासाठी निवांतपणा आणि पुरेसा वेळ मिळत नाही. त्यामुळे पारंपरिक पद्धतीने होळी साजरी करणे कठीण होऊन बसते. ही अडचण लक्षात घेऊन महिला बचत गटांनी पुरणपोळी बनवण्याचा व्यवसाय सुरू केला आहे.

होळीनिमित्ताने घरगुती व विविध खाद्यपदार्थांच्या दुकानात, बचत गटांना ग्राहकवर्गाकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे, मात्र, मैदा किंवा गव्हाचे पीठ, गूळ, चण्याची डाळ, तूप आदी साहित्याच्या किमती दरवर्षीप्रमाणे यंदाही वाढल्या आहेत. त्यामुळे पुरणपोळीच्या किमतीतही काही प्रमाणात वाढ झाली आहे.

# पाकिस्तानमधील १८ हिंदू निर्वासितांना भारतीय नागरिकत्व



**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

केंद्र सरकारने नागरिकत्व दुरूस्ती कायद्याची अधिसूचना काढल्यानंतर आता देशभरात त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. गुजरातच्या अहमदाबाद जिल्ह्यात पाकिस्तानमधून आलेल्या १८ हिंदू निर्वासितांना भारतीय नागरिकत्व बहाल करण्यात आले. गुजरातचे गृहराज्यमंत्री हर्श संघवी यांनी जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात आयोजित केलेल्या शिबिरामध्ये १८ नागरिकांना नागरिकत्व देण्यात आले तसेच नव्या भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी एकत्र काम करण्याचे आवाहन केले.

या शिबिरादरम्यान संघवी म्हणाले की, आपण सर्वांनी देशाच्या विकासासाठी एका प्रवाहामध्ये येण्याची गरज आहे. ज्यांनी भारतीय नागरिकत्व प्राप्त केले आहे, सर्वांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार कटिबद्ध आहे. जिल्हाधिकाऱ्या कार्यालयाने दिलेल्या निवेदनानुसार, २०१६ आणि २०१८च्या राजपत्रातील अधिसूचनेनुसार गुजरातमधील अहमदाबाद, गांधीनगर आणि कच्छच्या जिल्हाधिकाऱ्यांना पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि बांगलादेशमधील अल्पसंख्याक समुदायातील लोकांना भारतीय नागरिकत्व देण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. या अधिकाराचा वापर करून आतापर्यंत अहमदाबाद जिल्ह्यात पाकिस्तानामधून आलेल्या १,१६७ हिंदू निर्वासितांना भारतीय नागरिकत्व देण्यात आलेले आहे.

राज्यमंत्री संघवी म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि बांगलादेशातील पीडित अल्पसंख्याकांना सहज आणि जलद भारतीय नागरिकत्व मिळावे, यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. ११ मार्च रोजी केंद्र सरकारने नागरिकत्व (दुरूस्ती) कायदा, २०१९ची अंमलबजावणी करण्यासाठी अधिसूचना काढण्यात आली. ज्यामुळे तीनही देशातील बिगरमुस्लीम धार्मिक अल्पसंख्याकांना भारताचे नागरिकत्व मिळविण्याचा मार्ग मोकळा झाला.

# स्पर्धा परीक्षार्थी तरुणीची १५ लाखांची फसवणूक

**पुणे : प्रतिनिधी**

ऑनलाइन टास्कच्या आमिषाने स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणीची सायबर चोरट्यांनी १५ लाख ४७ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी विश्रामबाग पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारदार तरुणी नारायण पेठेतील एका वसतीगृहात राहायला असून, ती स्पर्धा परीक्षेची तयारी करीत आहेत. सायबर चोरट्यांनी तिच्या मोबाईल क्रमाकांवर संदेश पाठवून ऑनलाईन पद्धतीने काम केल्यास चांगले पैसे मिळतात. घरातून काम करण्याची संधी, असे आमिष तरुणीला दाखविले होते.

सुरुवातीला तरुणीला सायबर चोरट्यांनी एक काम दिले. तिला चोरट्यांनी पैसे दिले. पैसे मिळाल्यानंतर तरुणीचा विश्वास बसला. तरुणीला जाळ्यात ओढून ऑनलाईन कामात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखविले.

तरुणीने वेळोवेळी नातेवाईक आणि कुटुंबीयांकडून पैसे घेऊन सायबर चोरट्यांच्या बँक खात्यात एकूण मिळून १५ लाख ४७ हजार रुपये जमा केले.

पैसे जमा केल्यानंतर चोरट्यांनी मोबाइल क्रमांक बंद केले. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर तरुणीने सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. सायबर चोरट्यांनी संबंधित गुन्हा विश्रामबाग पोलिसांकडे तपासासाठी सोपविला. पोलीस निरीक्षक घोडके तपास करत आहेत.

# कार्यकर्ते ही आरपीआयची शिदोरी -राहुल डाळिंबकर

**कर्जत : प्रतिनिधी**

कार्यकर्ते ठाम असल्यानेच नेत्यांना काम करणे सुलभ होते. कार्यकर्ते ही आरपीआयची शिदोरी आहे. निवडणुकीच्या वेळी कार्यकर्त्यांची फळी काम करते म्हणूनच उमेदवार निवडून येतात, असे प्रतिपादन आरपीआय आठवले गटाचे कोकण प्रदेश कार्याध्यक्ष राहुल डाळिंबकर यांनी केले.

केंद्रीय मंत्री नामदार रामदास आठवले यांच्या माध्यमातून आरपीआय कोकण प्रदेश कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. या कार्यकर्त्यांचे स्वागत आणि सत्काराचे आयोजन कर्जत शहर आरपीआय आठवले गटाच्या वतीने करण्यात आले. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गटाच्या वतीने काही दिवसांपूर्वी कोकण प्रदेशमधील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. त्यातील कर्जत तालुक्यातील कार्यकर्त्यांवर पक्षाचे अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी अनेक जबाबदाऱ्या दिल्या आहेत. कर्जत, नेरळ, माथेरान शहराच्या वतीने कोकण पदाधिकाऱ्यांची सत्कार समारंभ कर्जत बुद्धनगर येथे आयोजित करण्यात आला होता. सभा अध्यक्षस्थानी आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ कार्यकर्ते दीपक भालेराव होते आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन करण्यात आले. राहुल डाळींबकर यांची कोकण प्रदेश कार्याध्यक्ष झाल्याबद्दल तर कोकण संघटक मारुती गायकवाड आणि कोकण उपाध्यक्ष काशिनाथ रुपवते, कोकण सचिव दिनेश गायकवाड, महाराष्ट्र युवक संघटक यादव उत्तम गायकवाड यांना वेगेवगेळ्या जबाबदाऱ्या देण्यात आल्याबद्दल त्या सर्वांचा सत्कार करण्यात आला. त्या वेळी कोकण प्रदेश अध्यक्ष म्हणून निवड झालेले प्रकाश मोरे हेदेखील आवर्जून उपस्थित होते.

कर्जत शहराध्यक्ष अरविंद मोरे, नीरज शहराध्यक्ष दिनेश आढाव, कर्जत महिला शहराध्यक्ष वैशाली भोसले, माथेरान शहराध्यक्ष मनीषा शिंदे, कविता शिंदे, वर्षा चिकणे यांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला, तसेच २० मार्चच्या महाड येथील कार्यक्रमाची रूपरेषा ठरवण्यात आली. या वेळी उपजिल्हाध्यक्ष नरेश गायकवाड, युवक तालुका अध्यक्ष अमर जाधव, उपाध्यक्ष प्रकाश गायकवाड, माजी नगरसेवक दीपक मोरे, कर्जत तालुका संघटक भालचंद्र गायकवाड, माजी संघटक भगवान जाधव, माजी सचिव मनोज गायकवाड, माजी युवक सचिव किशोर जाधव, कर्जत विधानसभा विधानसभा अध्यक्ष किशोर गायकवाड, संतोष जाधव युवक शहराध्यक्ष राहुल गायकवाड व पदाधिकारी उपस्थित होते.

# लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आयटी ॲप्लिकेशन्स

**रायगड : रामप्रहर वृत्त**

यंदाच्या लोकसभा निवडणुकीमध्ये विविध विषयांची प्रभावी अंमलबजावणी करता यावी व त्यावर नियंत्रण ठेवता यावे या हेतूने भारत निवडणूक आयोगाने आयटी ॲप्लिकेशन्स विकसित केले आहेत. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन रायगडचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत प्राप्त होणाऱ्या तक्रारींचा तातडीने निपटारा करण्यासाठी निवडणूक आयोगाने सी-व्हिजील मोबाईल ॲप विकसित केले आहे. यामध्ये दक्ष नागरिकाला एखाद्या ठिकाणी आचारसंहितेचा भंग होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्या प्रसंगाचे या ॲपमध्ये छायाचित्र अथवा व्हीडीओ काढून तक्रार नोंदविता येणार आहे व त्यावर जिल्हा प्रशासन तसेच मुख्य निवडणूक कार्यालयाकडून तातडीने कार्यवाही करण्यात येणार आहे.

पात्र दिव्यांगांना मतदार नोंदणी करणे, मतदान केंद्राचा शोध घेणे, व्हीलचेअरची मागणी नोंदविणे इ. सोयी उपलब्ध करून घेण्यासाठी हे आयटी ॲप्लिकेशन्स उपलब्ध करून देण्यात आले आहे. मतदारांना त्यांच्या उमेदवाराबाबतचा तपशील त्यामध्ये त्यांच्या नावे असलेले गुन्ह्यांचा तपशील, उमेदवाराची माहिती, इ. माहिती पाहता येऊ शकते.

निवडणूक अधिक निष्पक्ष व्हावी यासाठी आचारसंहितेच्या कालावधीत शासनाच्या अंमलबजावणी यंत्रणांकडून बेकायदेशीर पैसा, दारू, अमली पदार्थ व भेटवस्तू, मौल्यवान धातू, इ. गोष्टी जप्त करण्यात येणार आहे. या जप्तीची माहिती भारत निवडणूक आयोगास दरदिवशी ईएसएमएस/पोर्टलवरून कळविण्यात येत आहे.

# खालापुरात नवभारत साक्षरता अभियानाला आजी-आजोबांचा प्रतिसाद

## १४१० जणांनी दिली परीक्षा

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यातील १६० परीक्षा केंद्रावर आलेल्या आजी-आजोबांच्या चेहऱ्यावर परीक्षेचा काहीसा तणाव दिसत असला तरी उत्साहदेखील कमी नव्हता. विशेष म्हणजे हे आजी-आजोबा नातवाला सोडायला परीक्षा केंद्रावर आले नव्हते तर स्वतः परीक्षा देण्यासाठी आले होते.

स्मार्टफोनच्या जमान्यात आपणदेखील स्मार्ट असायला हवे या विचाराने खालापुरातील १४१० निरक्षराने नवभारत साक्षरता अभियानांतर्गत रविवारी (दि.१७)परीक्षा दिली. केंद्र शासनाच्या नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत निरक्षरांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. २०२७पर्यंत कोणीही निरक्षर राहू नये हा मुख्य उद्देश नवभारत साक्षरता अभियानाचा आहे.



### निरक्षरांसाठी नवभारत साक्षरता अभियान

**नवभारत साक्षरता अभियान कार्यक्रमांतर्गत निरक्षरांची मूलभूत व संख्या विज्ञान ही एकूण १५० गुणांची परीक्षा आहे. यामध्ये वाचन, लेखन व संख्या या प्रत्येक विषयाची ५० गुणांची परीक्षा असते. उत्तीर्ण होण्यासाठी ५१ गुण मिळणे आवश्यक आहे. १५ वर्षे व त्याहून अधिक वयाच्या निरक्षरांसाठी नवभारत साक्षरता अभियान सुरू करण्यात आले आहे.**

खालापुरातील सुमारे १४१० निरक्षरांची नोंदणी करण्यात आली होती. रविवारी उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी परीक्षा तालुक्यातील १६० केंद्रावर घेण्यात आली. तीन तासाची परीक्षेला नवसाक्षर होण्यासाठी तयारी करून आलेल्या परीक्षार्थींचा चांगला प्रतिसाद दिसून आला.

**५१ गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या परीक्षार्थीला प्रमाणपत्र मिळणार आहे. तालुक्यातून चांगला प्रतिसाद नवभारत साक्षरता अभियानाला मिळाला आहे.**

**-कैलास चोरामुळे, गटशिक्षण अधिकारी, खालापूर**

# निवडक

## चिमुकलीवर अत्याचार; आरोपी अटकेत



**उरण :** तालुक्यातील चिर्ले परिसरात अडीच वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करण्यात आला आहे. याप्रकरणी व्यवसायाने वाहनचालक असलेल्या चिन्नया व्यंकटमन (वय ३५) याला पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्यावर भारतीय दंड विधान कलम ३७३ तसेच पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, लहान मुलींवर अत्याचार होण्याच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. अशा नराधमांना कठोर शिक्षा व्हावी, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

## अवैध वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई

**पनवेल :** खारघर येथील मुंबई-पुणे मार्गावर अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर वाहतूक विभागाकडून कारवाई केली जात असल्यामुळे अवैध वाहतूक चालकांचे धाबे दणाणले आहे. पुणे-मुंबई मार्गावर खासगी वाहनांमधून मोठ्या प्रमाणात अवैध प्रवासी वाहतूक होते. खारघर परिसरातून पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगलीकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक असते. त्यामुळे अवैध प्रवासी वाहतूक खारघर येथील हिरानंदानी बसथांब्यावर वाहने उभी करतात. सायंकाळनंतर या गाड्या निघत असल्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत असते. त्यामुळे खारघर वाहतूक शाखेकडून अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांकडून दहा हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात येत आहे.

# पनवेलमध्ये आणखी १३०० सीसीटीव्ही कॅमेरे

## वाढत्या चोऱ्या, महिलांची सुरक्षा आणि वाहतूक कोंडीवर उपाययोजना

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका क्षेत्रात वाढत्या चोऱ्या, महिलांची सुरक्षा आणि वाहतूककोंडीवर नियंत्रणासाठी पालिका प्रशासन शहरभर १३०० सीसीटीव्ही कॅमरे लावणार आहे. कॅमेरा आणि नियंत्रण कक्ष यासाठी पालिका तब्बल १२० कोटी रुपये खर्च करणार आहे. याबाबत पालिकेने निविदा प्रसिद्ध केली आहे. पनवेलमधील नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून गर्दीच्या व महत्त्वाच्या ठिकाणी शहर पोलीस ठाण्याच्या वतीने या पूर्वी ४४ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पोलीस ठाण्यात भेट देऊन सीसीटीव्ही कंट्रोल रूमची पाहणी केली होती.



पनवेल महापालिकेच्या स्थापनेपासून पालिका क्षेत्रात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे उभे करा, अशी मागणी पोलीस विभागाकडून केली जात होती. नुकतेच नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे हेही यासाठी आग्रही होते. आयुक्त भारंबे आणि पालिका आयुक्त तथा प्रशासक गणेश देशमुख यांची याबाबत चर्चा झाल्यानंतर सीसीटीव्ही लावण्याच्या प्रक्रियेला वेग आला. शहरातील मुख्य चौकांमध्ये आणि सार्वजनिक ठिकाणी कॅमेरे लावले जाणार आहेत. या कॅमेऱ्यांमधील हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी पोलीस विभागाच्या नियंत्रण कक्षासोबत

### महापालिका करणार तब्बल १२० कोटी खर्च

कॅमेऱ्यांची जोडणी केली जाईल. महानगरपालिकेचा अर्थसंकल्प नुकताच सादर करण्यात आला. त्यामध्ये महिला सक्षमीकरण व महिलांची सुरक्षा यासाठी प्राधान्याने तरतूद केल्याचे पालिकेने स्पष्ट केले.

पनवेल पालिकेच्या मुख्यालयात कॅमेऱ्यांचा स्वतंत्र नियंत्रण कक्ष असेल. वाहतूककोंडीच्या समस्येवर मात करण्यासाठी कॅमेऱ्यांमुळे पोलिसांना मदत मिळेल. शहरात रस्त्याने पायी चालताना मोबाइल चोरी व मंगळसूत्र चोरीच्या घटना मागील दोन वर्षांत घडल्या आहेत या गुन्हेगारीला आत्ता आळा बसून आरोपींचा शोध घेण्यास पोलिसांना चांगलीच मदत होणार आहे. या कामी १२० कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित असल्याची माहिती मिळत आहे.

दरम्यान, यापूर्वी तयार करण्यात आलेल्या कंट्रोल रूमद्वारे एखाद्या ठिकाणी गर्दी झाल्यास किंवा कोणती दुर्घटना घडल्यास या कंट्रोल रूममधूनच स्पिकरच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात येते. शहरातील गर्दीची ठिकाणे बाजारपेठ, सराफ बाजार, मिरची गल्ली आदी ठिकाणच्या वाहतूक कोंडीसंदर्भातसुद्धा या वेळी चर्चा झाली होती. यामध्ये पनवेल शहरात अजूनही जास्त सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची गरज असल्याने या संदर्भात आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासनदेखील आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिले होते. त्यानुसार आता पनवेल शहरात आता आणखी १३०० सीसीटीव्ही कॅमरे बसविण्यात येणार आहेत.

> **शहरभर सीसीटीव्हीचे जाळे व नियंत्रण कक्ष उभारून शहरातील नागरिक आणि विशेषतः महिलांना सुरक्षित करणे हा एक यामागचा उद्देश आहे.**
> **-गणेश देशमुख, आयुक्त, पनवेल महापालिका**

## उरण ओएनजीसी येथे रक्तदान शिबिर

**उरण : वार्ताहर**

येथील ओएनजीसी उरण प्लांट व पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने ओएनजीसी उरण प्लांट येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. हे शिबिर द्रोणागिरी भवन ओएनजीसी उरण येथे शुक्रवारी (दि. २२) सकाळी ६ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत राहील, असे आयोजकांनी सांगितले.

शिबिराचे उद्‌घाटन कार्यकारी निर्देशक सयंत्र व्यवस्थापक उरण शुभोजित बोस यांच्या हस्ते होणार आहे. शिबिरासाठी सरचिटणीस पीईयु मुंबई संतोष पाटील, समूह महाव्यवस्थापक प्रमुख ऑपरेशन देवेंद्र त्रिवेदी, मुख्य महाव्यवस्थापक प्रमुख अनुरक्षक विक्रम सिंह, माजी सरचिटणीस पीईयु मुंबई उपाध्यक्ष एन.खानविलकर, मुख्य महाव्यवस्थापक धिरज उमरेडकर, महाव्यवस्थापक प्रभारी मानव संसाधन भावना आठवले, व्यवस्थापक (एच आर) गौरव पतंगे, डीजीएस पीईयु, मुंबई वैभव लवेकर, सेक्रेटरी विलेश घरत, सेक्रेटरी समाधान मढवी, सीईसी, पीईयु घनशाम घरत, सीईसी पीईयु विवेक पाटील व पीयुई कार्यकारीणी आणि सेक्रेटरी सर्व सभासद आदींचे सहकार्य लाभणार आहे, असे सेक्रेटरी विलेश घरत यांनी सांगितले.

## सुरक्षारक्षकाची आत्महत्या

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील एका इमारतीच्या टेरेसवर सुरक्षा रक्षकाने कोणत्या तरी अज्ञात कारणावरून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

सुरक्षारक्षक हरी बाबू (वय ४२) याने रतन व्हीला सोसायटीच्या टेरेसवर कोणत्या तरी अज्ञात कारणावरून गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.







**पनवेल :** श्री गोयम लब्धि जैन संघाच्या वतीने करंजाडे येथे गोयम लब्धि भक्ती भवनचा कार्यक्रम रविवारी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. त्यांचे आयोजकांच्या वतीने स्वागत करण्यात आले. या वेळी सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, भाजप विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, उपविभागीय अध्यक्ष नाथा भरवाड, सदस्य सुनील भोईर, माजी सदस्य सुरेश शेलार, माजी सदस्य बळीराम भोईर, बळीराम म्हात्रे, मनिष परमार, महावीर पोखरना, संदीप ठाकड, विजय दुक्कड, पंकज सोनी, हस्तीमल जैन आदी उपस्थित होते.



**पनवेल :** भाजप महिला मोर्चाच्या पदाधिकारी अनिता रासकर आणि वंदना म्हात्रे यांचा वाढदिवस रविवारी खांदा कॉलनी येथील जनसंपर्क कार्यालयात साजरा करण्यात आला. या वेळी भाजप सरचिटणीस भीमराव पोवार, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, भाजप पदाधिकारी गोपीनाथ मुंडे, मागासवर्गीय सेलचे अध्यक्ष चंद्रकांत सोनवणे, सावंत, बेडसे, राजू महापूरकर, प्रेमा भोपी, आशा मुंडे, विद्या यादव, स्वाती नांगरे, लता बंडगर, स्नेहल सकपाळ, शुभांगी रायते, विद्या अंबे, निलू जोशी, मनीषा कोळी, सुनीता मोरे आदी उपस्थित होते.

## भाजप सोशल मीडिया सेलची बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांच्या उपस्थितीत पनवेल विधानसभा क्षेत्रामधील भाजप सोशल मीडिया सेलची बैठक रविवारी (दि. १७) भाजप मध्यवर्ती कार्यालयात झाली. या वेळी नवनियुक्त पनवेल शहर सदस्य अमोल चंदने यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

या बैठकीस जिल्हा संयोजिका ॲड. गायत्री परांजपे, जिल्हा आयटी सेल प्रमुख नितेश सोलंकी, पनवेल शहर संयोजक प्रसाद हनुमंते, कामोठे संयोजक प्रवीण वाघमारे, खारघर संयोजक अजय माळी, पनवेल तालुका संयोजक धनाजी भोईर तसेच आयटी सेल आणि सोशल मीडिया सेलचे सहसंयोजक, सदस्य उपस्थित होते.







# पनवेलमध्ये जागतिक ग्राहक दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल उरण आगरी समाज मंडळ, पनवेल व जनजागृती ग्राहक मंच, रायगड- तालुका पनवेल शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा ज्योतिबा फुले (आगरी समाज हॉल) सभागृहात जागतिक ग्राहक दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.





या वेळी ग्राहक चळवळीच्या प्रमुख कार्यकर्त्या शैलजा आपटे म्हणाल्या की, निरनिराळ्या भेटवस्तूंचे अमिष दाखविणाऱ्या अनुचित व्यापारी प्रथेविरुद्ध ग्राहकाने लढा देणे आवश्यक आहे, पूर्वी आठवडे बाजार भरायचा. त्यात ग्राहकाला प्राधान्य असायचे. ग्राहक उपभोक्ता जन्मापासून मृत्यूपर्यंत किंबहुना मृत्यूनंतरही उपभोक्ता असतो. ग्राहक राजा असूनदेखील तो सामान्य मानला जातो. ग्राहकास निवडीचा, माहितीचा, संरक्षणाचा व तक्रारीचा अधिकार असतो.

उत्पादनावर हॉलमार्क, आगमार्कसारखा मार्क असतो. उत्पादनाच्या वेस्टनावर वस्तूचे नाव, उत्पादकाचे नाव, वस्तूचे वजन, किंमत, पोषणमूल्य, मूळ घटक इत्यादी तपशील असतो. अन्नपदार्थाच्या बाबतीत शाकाहारी की मांसाहारी दर्शविणाऱ्या खुणा असतात. औषधाच्या बाबतीत वापराच्या अंतिम तारखेचा उल्लेख असतो. आकाशवाणीचा जागो ग्राहक जागो. हा कार्यक्रम माहितीप्रद असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच वस्तूची खरेदी केल्यानंतर त्याची पावती घेण्याविषयी त्यांनी सूचना केल्या.

याबरोबरच खरेदी करताना सामाजिक व पर्यावरणाचे भान ठेवणे विषयी त्यांनी आवर्जून सांगितले. ग्राहक संरक्षण कायद्याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली. श्रोत्यांच्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला हार घालून करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जनजागृती ग्राहक मंचाचे अध्यक्ष काशिनाथ जाधव यांनी केले. प्रास्तविकामध्ये त्यांनी संस्थेच्या वाटचाली विषयी माहिती दिली. अनेक संस्थांचे पदाधिकारी असलेल्या रमेश एरंडे यांनी ग्राहक चळवळीविषयी मौलिक माहिती दिली.

आगरी समाज मंडळाचे अध्यक्ष अतुल दि.बा. पाटील यांनी वस्तूच्या वेष्टणावरील छापील किमतीपेक्षा जास्त पैसे देऊ नयेत. हे आवर्जून सांगितले.

खारघर सहकार भारतीच्या त्रिवेणी सालकर यांनी त्यांच्या संस्थेच्या कार्याविषयी माहिती दिली. कार्यक्रमास जनजागृती ग्राहक मंचाचे जिल्हाध्यक्ष मंगेश माळी, तालुका उपाध्यक्ष सुभाष फडके, आगरी समाज मंडळाचे उपाध्यक्ष अनंतराव पाटील, संदीप पाटील आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आगरी समाज मंडळाचे खजिनदार विजय गायकर यांनी अस्खलितपणे केले. आगरी समाज मंडळाचे व ग्राहक मंचाचे सचिव बी. पी. म्हात्रे यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रमेश चव्हाण, संतोष विचारे, राजकुमार ताकमोगे, सुभाष मेहकर, दिलीप मोरे, रत्नाकर कुलकर्णी, दत्तात्रेय जाधव, अभिषेक मस्के, चेतन ठाकूर, दत्ता ढोले या जनजागृती ग्राहक मंचाच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# थकीत कराच्या वसुलीसाठी पनवेल मनपाने कंबर कसली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्यावतीने थकबाकीदारांच्या मालमत्ता कर वसुलीची मोहीम अधिक तीव्र केली असून, थकीत कराच्या वसुलीसाठी महापालिकेची धडक मोहीम सुरू केली आहे. आता दैनंदिन नऊ वसुली पथकांच्या बरोबरीने निवासी थकबाकीदारांकडून वसुली करणेकरीता सात वसुली पथकांची वाढ करण्यात आली आहे.

वसुली माध्यमातून महापालिकेच्या विविध भागांमध्ये जप्ती नोटिसांचे वाटप, तसेच थकबाकीदारांना मालमत्ता कर लवकर भरण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत. निवासी, औद्योगिक व व्यवसायिक थकबाकीदारांनी थकीत मालमत्ता कर भरून जप्ती कारवाई टाळावी, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

चारही प्रभागांमध्ये वसुली पथकांच्या माध्यमातून पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील थकीत मालमत्ता कर दात्यांना ४२९ हून अधिक जप्ती नोटिसांचे वाटप करण्यात आले आहे. वसूली पथकांच्या माध्यमातून वसूली मोहीम तीव्र करण्यात आली असून रविवारी खारघरमध्ये तीन मालमत्तांवर अटकावणीची कारवाई करण्यात आली.



या आर्थिक वर्षात २८५ कोटी मालमत्ता कर जमा झाला आहे. तसेच आत्तापर्यंत एकुण ५७१ कोटी मालमत्ता कर पालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे. नुकत्याच झालेल्या सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाने पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ता कर आकारणीस पालिकेस कोणतीही स्थगिती दिलेली नाही, त्यामुळे मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर भरून महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

## संपादकीय

# लोकसभेचा रणसंग्राम

जगातील सर्वांत मोठी लोकशाही असलेल्या भारतात महत्त्वपूर्ण अशा लोकसभा निवडणुकीची घोषणा झाली असून आदर्श आचारसंहिताही लागू झाली आहे. शिवाय चार राज्यांची विधानसभा निवडणूक व देशातील २६ रिक्त ठिकाणी पोटनिवडणूकही होणार आहे. यानिमित्ताने पुढील सुमारे अडीच महिने देशात राजकीय रणधुमाळी असणार आहे. या वेळची निवडणूक वेगळी असणार आहे. निवडणूक आयोगाने अनेक बदल करून मतदानप्रक्रिया सुलभ करण्याचा प्रयत्न केला आहे.

**खंडप्राय भारतात वर्षभर कुठे ना कुठे कुठली ना कुठली निवडणूक होत असते. मध्यंतरी कोरोना काळात याला ब्रेक लागला होता, पण हा अपवाद वगळता देशात सतत वेगवेगळ्या निवडणुका होत असतात. यामध्ये देशाचे भवितव्य ठरविणाऱ्या लोकसभा निवडणुकीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या निवडणुकीद्वारे देशाची सूत्रे नागरिक कुणाच्या हातात देणार याचा फैसला होणार असतो. अशा या सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा झाली असून एकूण ५४३ जागांसाठी १९ एप्रिल, २६ एप्रिल, ७ मे, १३ मे, २० मे, २५ मे व १ जून अशा सात टप्प्यांमध्ये रणसंग्राम होणार आहे, तर ४ जूनला मतमोजणी होऊन निकाल जाहीर होईल. लोकसभा निवडणुकीची तयारी राजकीय पक्षांनी गेल्या वर्षापासूनच सुरू केली आहे. निवडणूक आयोगही या निवडणुकीसाठी सज्ज झाला आहे. लोकसभा निवडणुकीसोबतच चार राज्यांची विधानसभा निवडणूक होणार आहे. यामध्ये अरुणाचल प्रदेश, आंध्र प्रदेश, ओडिशा आणि सिक्कीम या राज्यांचा समावेश आहे; तर बऱ्याच काळापासून रिक्त असलेल्या विधानसभा मतदारसंघांतील पोटनिवडणुकीचीही या वेळी घोषणा करण्यात आली आहे. देशातील एकूण २६ विधानसभा मतदारसंघांमध्ये ही पोटनिवडणूक घेण्यात येणार आहे. ज्या राज्यांमध्ये पोटनिवडणूक होणार आहे त्यामध्ये बिहार, त्रिपुरा, हरियाणा, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, झारखंड, उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश, राजस्थान, तामिळनाडू या राज्यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक होणार आहे. अशा प्रकारे आता देशात निवडणुकांचा माहौल सुरू झाला आहे. निवडणूक प्रक्रिया सुकर व्हावी यासाठी आयोगाने काही निर्णय घेतले आहेत. त्यानुसार वोट फ्रॉम होम संकल्पना राबविण्यात येणार आहे, ज्यानुसार ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या किंवा ४० टक्क्यांहून अधिक अपंगत्व असलेल्या मतदारांना मतदान केंद्रावर जायचे नसेल, तर त्यांच्या घरी जाऊन त्यांचे मत नोंदवले जाईल. निवडणुकीसाठी २७ ॲप्स आणि पोर्टल तयार करण्यात आले आहेत; तर दुसरीकडे निवडणुकीदरम्यान कुठे गैरप्रकार सुरू असतील असे निदर्शनास आल्यास त्याचा एक फोटो काढून सी-विजील ॲपवर टाकल्यास आयोगाची टीम १०० मिनिटांत तेथे पोहचून कारवाई करणार आहे. निवडणुकांमध्ये हिंसा होऊ न देण्याचा निर्धारही त्यांनी केला आहे. हे सर्व पाहता यंदाची निवडणूक वैशिष्ट्यपूर्ण ठरणार आहे. आयोग याची तयारी करीत असताना राजकीय पक्ष कसे मागे राहतील. त्यांनी मागील वर्षभरापासून लोकसभेची तयारी सुरू केली आहे. विशेषत: भाजपने ४००पार जागांसह नरेंद्र मोदींच्या पंतप्रधानपदाची हॅट्ट्रिक साधण्यासाठी कंबर कसली आहे. दुसऱ्या बाजूला विरोधकांची इंडिया आघाडी अजूनही चाचपडत आहे. त्यामुळे निकाल स्पष्ट आहे. आता या निवडणुकीत काय काय रंग भरले जाणार हे येणाऱ्या कालावधीत दिसून येईल.**

# कर्जतमध्ये पाणीटंचाई रोखण्यासाठी उपाययोजना





### खबरबात
विजय मांडे

'पाणी म्हणजे जीवन' कर्जत तालुक्यातील काही गावात मार्च महिन्यापासूनच पाणी टंचाईला तोंड द्यावे लागते. तरीही शासनाचे टँकर एप्रिल महिन्यापासून टंचाईग्रस्त गावे व वाड्यांना पाणीपुरवठा करतात. आमदार महेंद्र थोरवे यांनी कर्जत तालुक्यातील पाणीटंचाई समूळ नष्ट करण्यासाठी पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडून भरीव निधी उपलब्ध करून घेतला आहे, परंतु त्या त्या गावातील पाणी योजना पूर्ण होण्यासाठी वेळ लागणार आहे. रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनीही आज पासूनच धाबेवाडी येथून मोफत पाणीवाटपाची सुरुवात केली. त्यामुळे कर्जत तालुक्यात पाणी टंचाई दूर करण्याचे प्रयत्न झाले. हे झाले ग्रामीण भागातले. कर्जत शहरातसुध्दा पाणीटंचाई सुरू आहे. टोकाच्या सर्वच विभागात पुरेसे पाणी मिळत नाही. येथेही उपाययोजना सुरू आहेत.

पंचवीस एक वर्षांपूर्वी कर्जत तालुक्यात भीषण पाणी टंचाई होती. रेल्वे पट्ट्यातील गावांमध्ये पाण्यासाठी वणवण करावी लागे. डीकसळ, चिंचवली आदी गावातील ग्रामस्थ लोकल गाडीने कर्जतला येत असत आणि स्टेशनवरून किंवा स्टेशन नजीकच्या विहिरीतून पाणी भरून पुन्हा लोकलने आपले घर गाठत असत. कर्जत शहरातसुद्धा पाण्यासाठी अनेकांना कसरत करावी लागे. पळसदरी गावानजीक रेल्वेने वाफेच्या इंजिनात पाणी भरण्यासाठी बांधलेल्या तलावाच्या पाण्यावर कर्जत ग्रामपंचायतीच्या गावांना पाणी पुरविले जात असे. १९९२ साली नगर परिषद झाल्यानंतर शहरासाठी नवीन पाणी योजना करण्याच्या हालचाली झाल्या. दोन आकडी लोकसंख्या जास्त असल्याने ही कर्जत वाढीव पाणी पुरवठा योजना निधीसाठी अडकली होती, मात्र त्यावेळी नगराध्यक्ष धनंजय चाचड, प्रवीण गांगल यांच्या बरोबर अन्य नगरसेवकांनी पाठपुरावा केला व तत्कालीन मंत्री रवींद्र माने यांच्या प्रयत्नाने ही योजना पूर्ण निधीनिशी मंजूर झाली. त्यावेळी १३ कोटी १४ लाख रुपयांची योजना बारमाही वाहणाऱ्या पेज नदीच्या पाण्यावर पूर्ण झाली. पूर्ण होतानाही अनेक अडचणी आल्या. १९९९ सरकार बदलले त्यामुळे त्यांचे निकष बदलले. अखेर एका वृत्तपत्राने त्यांच्या उपक्रमाद्वारे या पाणी योजनेचा तब्बल सात वर्षे पाठपुरावा केला आणि ही योजना २३ एप्रिल २००६ रोजी लोकांसाठी प्रत्यक्षात सुरू झाली व त्यांना स्वच्छ व पुरेसे पाणी उपलब्ध झाले. या योजनेचे उदघाटन नगरपरिषद करू शकली नाही. या निमित्ताने देशात एक इतिहास घडला. योजना शासनाने पूर्ण केली व विजयोत्सव संबंधित वृत्तपत्राने लोकांच्या सहभागाने साजरा केला. २०३१ पर्यंतच्या लोकसंख्ये पर्यंत ही योजना होती, परंतु कर्जत शहराचा विकास इतक्या झपाट्याने झाला की, दहा वर्षे आधीच म्हणजे २०२१ मध्येच या योजनेचे पाणी कमी पडू लागले.

आमदार थोरवे यांनी नेरळ पाणीपुरवठा योजनेसाठी ४० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून या योजनेचे भूमिपूजनसुद्धा केले असून कर्जत शहरासाठी नवीन पाणी पुरवठा योजना व्हावी म्हणून आमदार महेंद्र थोरवे यांनी पाठपुरावा केल्याने ५७ कोटी रुपयांची पाणी योजना मंजूर झाली आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कर्जतकरांना दिलेला शब्द पाळला. ही योजना पूर्ण झाल्यानंतर कर्जत शहरात मुबलक पाणी मिळेल.

ग्रामीण भागाची परिस्थिती फारच वेगळी होती. १९६० पूर्वी गावोगाव पाणी टंचाई असायची मात्र कर्जतच्या पूर्व भागात टाटा कंपनीच्या वीज उत्पादन करून वाहणाऱ्या पाण्यावर राजनाला तयार केला आणि पिण्याच्या पाण्याचाच नव्हे तर दुबार शेतीलाही भरपूर प्रमाणात पाणी मिळू लागले. तालुक्याच्या अन्य भागातही बंधाऱ्यांची निर्मिती झाली आणि पाणी टंचाईच्या झळा कमी झाल्या. तरीही १८ गावे आणि ६० आदिवासी वाड्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मागील वर्षी तालुक्यातील १६ गावे आणि ५६ आदिवासी वाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या उद्भवणार असा संभाव्य पाणीटंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला होता.

या वर्षी तालुक्यातील खांड्स, ओलमन, व वाड्यांमध्ये टँकरने पाणी पुरवठा चेवणे, नांदगाव, तुंगी, ढाक, पेठ, अट निड, अंत्रट वरेडी, मोग्रज, पिंगळस, धामणी, खानंद, अंभेरपाडा, मोहोपाडा, भोपळेवाडी, सुतार पाडा, गरुड पाडा अशा १८ गावांमध्ये पाणीटंचाईची परिस्थिती उद्भवणार आहे. तर तालुक्यातील ६० आदिवासी वाड्यांमध्ये पाण्याची टंचाई भासणार असल्याने तेथील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला, मात्र असे असले तरी दोन टँकर या सगळ्या कृती आराखड्याचा भार वाहत असतात. त्यामुळे पाणी समस्या बिकट होऊ लागते. ताडवाडी येथील आदिवासी लोकांचे पाण्यासाठी हाल असतात. ताडवाडी आणि मोरेवाडी येथील आदिवासी लोकांसाठी नळपाणी योजना राबविण्याचा निर्णय झाला असून योजनेचे काम सुरू आहे, मात्र काम लांबणीवर जात आहे. दरम्यान, निर्माण झालेली पाणीटंचाई मुळे येथील महिलांना रात्री विहिरीवर झोपून काढावी लागत असल्याचे भीषण वास्तव समोर आले आहे.

ही पाणीटंचाई दूर करण्यासाठी आमदार महेंद्र थोरवे सरकारच्या माध्यमातून टंचाईग्रस्त गावे व वाड्यांना पाणीपुरवठा व्हावा म्हणून पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्या माध्यमातून जल जीवन मिशनमधून नळ पाणी पुरवठा योजना तयार करण्यात यशस्वी ठरले आहेत. तर उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत व रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे स्वखर्चाने पाणीटंचाईवर मात करण्यासाठी सरसावले होते. लोकसभा निवडणुका जाहीर झाल्याने आचारसंहिता काल पासून सुरू झाली आहे. त्यामुळे मनात असूनही लोकप्रतिनिधींना स्वखर्चानेसुध्दा टँकर किंवा बोअरवेल खोदणे अडचणीचे ठरू शकते. त्यामुळे सर्व मदार शासकीय यंत्रणेवर अवलंबून आहे.

## बदलते तंत्रज्ञान

### आयफोन होईल वॉकी-टॉकी; मे महिन्यापर्यंत कमाल फीचर

तुमचा आयफोन लवकरच Walkie-Talkie होईल. मायक्रोसॉफ्ट Teams Eon च्या मदतीने हा करिष्मा होईल. आयफोनमध्ये व्हाईस इंटरॅक्शनसाठी एक नवीन फीचर आणण्याची तयारी कंपनीने केली आहे. त्यामुळे iPhone लवकरच वॉकी-टॉकी सारखे काम करेल. एका रिपोर्टनुसार, Microsoft च्या टीम्स ऐपमध्ये आयफोनसाठी वॉकी -टॉकी हे फीचर इंटिग्रेट करण्याची योजना आहे हे फीचर तुम्हाला आयफोनमध्ये मे महिन्यापर्यंत मिळू शकते. त्यामुळे आयफोनधारकांना त्यांचा स्मार्टफोन एखाद्या Walkie-Talkie सारखा वापरता येईल.



**अशी मिळेल ही सुविधा**

बिझनेस टुडेच्या वृत्तानुसार, या नवीन फीचरमुळे युझर्सला सेफ वॉईस कम्युनिकेशनचा अनुभव घेता येईल. आयफोन युझर्स हे फीचर त्यांचा फोन लॉक असतान पण वापरु शकतील. त्यांना लॉक स्क्रीन असताना पण वॉकी-टॉकीचे फीचर वापरता येईल. या इंटिग्रेशन मे महिन्यात आयफोन धारकांना मिळण्याची दाट शक्यता आहे. अर्थात डेव्हलपर्स त्यासाठी अधिक काळ लागू शकतो, असे सांगत आहे. काही तांत्रिक चुका टाळण्यासाठी काही काळ लागणार आहे.

**पुश-टू-टॉकचा वापर**

या वॉकी-टॉकी फीचरसाठी मायक्रोसॉफ्ट कंपनी एप्पलच्या पुश-टू-टॉक फ्रेमवर्कचा वापर करणार असल्याचे समोर येत आहे. iOS आणि एंड्रायड प्लेटफॉर्मवर Microsoft Teams साठी जीसीसी क्लाउड इंस्टेंसवर त्याचा सहज वापर करता येईल. आईडी ३८८४८६ कडून ओळख पटविण्यासाठी मायक्रोसॉफ्ट ३६५ रोडमॅपचा नुकताच वापर करण्यात आला होता. हे टीम्सचा वापर वाढण्यासाठी फार मोठे पाऊल असल्याचे सांगण्यात येत आहे.

**यापूर्वी फीचरचा वापर**

मायक्रोसॉफ्ट कंपनी नवनवीन फीचरवर काम करत आहे. त्यांच्या प्लॅटफॉर्मवर या नवनवीन फीचर्सचा युझर्सला मोठा फायदा होत आहे. मायक्रोसॉफ्ट टीम्सचा वापर हा जास्त करून मीटिंग अटेंड करण्यासाठी होतो. खासकरुन वर्क फ्रॉम होमसाठी हा पर्याय एकदम बेस्ट मानण्यात येतो. मायक्रोसॉफ्ट टीम्सने वॉकी-टॉकी फीचरचा यापूर्वी पण वापर केला आहे. फ्रंटलाईन वर्कर्ससाठी ऑन फील्डवर त्याचा वापर करण्यात आला होता. आता हेच फीचर आयफोनसाठी वापरण्यात येणार आहे. या मे महिन्यात ते आयफोन युझर्ससाठी उपलब्ध होईल.

# ख्यातनाम अभिनेता शशी कपूर

हिंदी चित्रपटसृष्टीतील ख्यातनाम अभिनेते शशी कपूर त्यांचे मूळ नाव बलबीर राज होय. त्यांचा जन्म कोलकाता येथे झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध अभिनेते पृथ्वीराज कपूर आणि मातोश्री रामसरनी कपूर. चित्रपट व नाट्यकलेशी निगडीत असणाऱ्या नामांकित कपूर घराण्यात जन्म झाल्यामुळे अभिनयकलेचा व चित्रपटाचा समृद्ध वारसा शशी कपूर यांनाही लाभला. आज त्यांचा जन्मदिन आहे. त्यानिमित्त त्यांच्याविषयीचा लेख...



### निमित्त

माटुंगा, मुंबई येथील 'डॉन बॉस्को' हायस्कूलमध्ये त्यांनी शिक्षण घेतले. १९४८ च्या राज कपूरनिर्मित आणि दिग्दर्शित आग या चित्रपटात बालकलाकाराची भूमिका करून त्यांनी चित्रपटांत पदार्पण केले. त्यानंतरच्या १९५१ मध्ये आलेल्या आवारा या चित्रपटात त्यांनी त्यांच्या जेष्ठ बंधूची, राज कपूर यांची कुमारावस्थेतील भूमिका वठवली. १९५४ पर्यंत त्यांनी बालकलाकार म्हणून काही चित्रपटांत कामे केली. त्यानंतर ते त्यांचे वडील पृथ्वीराज कपूर यांच्या पृथ्वी थिएटर या रंगभूमीशी निगडीत मंडळाशी जोडले गेले.

ख्यातनाम अभिनेते सुनील दत्त यांच्या पदार्पणाचा पहिला चित्रपट असलेल्या पोस्ट बॉक्स ९९९ या चित्रपटासाठी शशी कपूर यांना साहाय्यक दिग्दर्शक म्हणून संधी मिळाली. त्यानंतर १९६१ पर्यंत गेस्ट हाउस, दुल्हा-दुल्हन, श्रीमान सत्यवादी यांसारख्या चित्रपटांतून सहाय्यक दिग्दर्शक म्हणून ते कार्यरत राहिले. १९६१ सालच्या यश चोप्रा दिग्दर्शित बी. आर. चोप्रा निर्मित धर्मपुत्र या चित्रपटातून त्यांनी नायकाच्या भूमिकेत पदार्पण केले. त्यानंतर तब्बल एकशे सोळा हिंदी चित्रपटांतून त्यांनी भूमिका केल्या. पैकी ६१ चित्रपटांतून ते नायकाच्या भूमिकेत चमकले. शशी कपूर हे केवळ एक चांगले अभिनेतेच नव्हते, तर एक व्यासंगी आणि कलासक्त, विद्वत व्यक्तिमत्त्व होते. स्वतःच्या 'फिल्मवालाज' या चित्रपट निर्मितीसंस्थेद्वारे त्यांनी आशयघन आणि दर्जेदार चित्रपटांची निर्मिती केली. त्यांपैकी १९७८ च्या शाम बेनेगल दिग्दर्शित जुनून या चित्रपटास सर्वोत्कृष्ट चित्रपटाच्या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, तर कलयुग या १९८१ मधील त्यांच्या निर्मितीस त्यावर्षीचा सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा फिल्मफेअर पुरस्कार देण्यात आला. त्यांनी निर्मिलेल्या १९८४ च्या उत्सव या, प्राचीन संस्कृत नाटककार शूद्रक यांच्या मृच्छकटिक या नाटकावर आधारित वेगळी वाट चोखाळणाऱ्या, चित्रपटाला देखील सर्वोत्कृष्ट कला दिग्दर्शनाचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पिता पृथ्वीराज कपूर यांच्या स्मरणार्थ शशी कपूर यांनी जुहू येथे दर्जेदार नाटकांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी सत्तरच्या दशकात 'पृथ्वी थिएटर'ची स्थापना केली. मुंबईतील एक प्रतिष्ठित असे ते नाट्यगृह आहे. १९९८ साली जिन्नाह आणि साईड स्ट्रीटस् या आंतरराष्ट्रीय चित्रपटात भूमिका केल्यानंतर शशी कपूर यांनी चित्रपट जीवनातून निवृत्ती घेतली. २०१० च्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात त्यांना जीवनगौरव पुरस्काराने गौरवण्यात आले. २०१५ साली शासनाने त्यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित केले. भारत सरकारने २०११ साली पद्मभूषण या मानाच्या नागरी पुरस्काराने त्यांचा सन्मान केला. शशी कपूर यांना अखेरच्या काळात यकृताच्या विकाराने ग्रासले. त्यांचे याच विकाराने मुंबईत निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

### क्लिक...क्लिक...!



**म्हसळा : वाढत्या उष्णतेमुळे तालुक्यातील मांदाटणे परिसरात वनक्षेत्रात वणवे लागत आहेत. त्यामुळे नैसर्गिक साधन संपत्तीचे मोठे नुकसान झाले आहे.** (छाया : अमेय नाझरे)

## आरोग्य प्रहर

### अंडे की दूध? आरोग्यासाठी काय अधिक फायदेशीर...

अंडी किंवा दूध दोन्ही गोष्टींचे सेवन मोठ्या प्रमाणात केले जाते. पण एक प्रश्न जो नेहमीच चर्चेत येतो आहे. ते म्हणजे अंडी की दूध दोघांपैकी कोणते अधिक फायद्याचे असते. या दोन्ही गोष्टींमध्ये भरपूर प्रमाणात पोषक तत्व असतात, जे शरीरासाठी फायदेशीर असतात. अंडी आणि दूध हे दोघांमध्ये प्रथिने मोठ्या प्रमाणात असतात. ज्या लोकांना स्नायूंची वाढ सुधारायची आहे त्यांनी अंडी आणि दूध यांचे सेवन करण्याचा सल्ला दिला जातो. या दोन्ही गोष्टींमध्ये जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात, पण अधिक फायद्याचे काय आहे जाणून घेऊयात.



हेल्थलाइनच्या अहवालानुसार एका उकडलेल्या अंड्यामध्ये (१ एसस ) सुमारे ६.३ ग्रॅम प्रथिने, ७७ कॅलरीज, ५.३ ग्रॅम एकूण चरबी, २१२ मिलीग्राम कोलेस्ट्रॉल, ०.६ ग्रॅम कार्बोहायड्रेट, २५ मिलीग्राम कॅल्शियम यासह व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी २, व्हिटॅमिन बी १२, व्हिटॅमिन असते. या शिवाय इ५, फॉस्फरस, सेलेनियमसह अनेक पोषक घटक असतात. विशेष म्हणजे यात कोलेस्टेरॉलचे प्रमाण जास्त असते, पण त्याचा रक्तातील कोलेस्टेरॉलवर कमी परिणाम होतो आणि त्यामुळे हृदयविकाराचा धोका वाढत नाही. ज्या लोकांना उच्च कोलेस्ट्रॉलची समस्या आहे त्यांनी अंडी खाण्यापूर्वी त्यांच्या डॉक्टरांचा किंवा आहारतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

एका कप दूध म्हणजेच २५० ग्रॅम दूधमध्ये. ८.१४ ग्रॅम उच्च दर्जाची प्रथिने, १५२ कॅलरीज, १२ ग्रॅम कार्ब, १२ ग्रॅम साखर, ८ ग्रॅम फॅट, २५० मिलीग्राम कॅल्शियम, व्हिटॅमिन बी १२, रिबोफ्लेविन, फॉस्फरस आणि इतर अनेक पोषक घटक असतात. दुधात ८८ टक्के पाणी असते, जे शरीराला हायड्रेट ठेवण्यास मदत करते. दुधात काही प्रमाणात व्हे प्रोटीनदेखील आढळते. प्रथिनांसह दूध कॅल्शियमचा उत्कृष्ट स्त्रोत मानला जातो. विशेष म्हणजे दुधापासून मिळणारे कॅल्शियम शरीरात सहज शोषले जाते. आता जर आपण दूध आणि अंडी यांची तुलना केली तर दोन्ही गोष्टींमध्ये प्रथिने चांगल्या प्रमाणात असतात. पण दुधात अंड्यांपेक्षा जास्त कॅल्शियम असते. अंड्यांमध्ये उच्च कोलेस्ट्रॉल असते, पण ते दुधात नसते. दोन्ही गोष्टींमध्ये कॅलरीजचे प्रमाण फार जास्त नसते आणि ते सेवन करणे सुरक्षित मानले जाते. पण जर तुम्ही शाकाहारी असाल तर दुधाचे मोठ्या प्रमाणावर सेवन करा. पण जर तुम्ही अंडी खात असाल तर तुम्ही आठवड्यातून चार ते पाच अंडी खाऊ शकता. दुसरीकडे तुम्ही दररोज दूध पिऊ शकता, कारण दररोज दूध पिल्याने कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत.

# रायगड लोकसभा मतदारसंघाचा निकाल यंदा महिलांच्या हाती!

## एकूण आठ लाख ४० हजार ४१६ स्त्री मतदार

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा मतदारसंघात एकूण १६ लाख ५३ हजार ९३५ मतदार आहेत. यात पुरूष मतदारांची संख्या आठ लाख १३ हजार ५१५ आहे तर स्त्री मतदारांची संखया आठ लाख ४० हजार ४१६ आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी शनिवारी (दि. १६) पत्रकार परिषद घेऊन प्रशासनाच्याह तयारीची माहिती दिली.

रायगड जिल्ह्यात अलिबाग, पेण, पनवेल, उरण, कर्जत, महाड आणि श्रीवर्धन या सात विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. जिल्ह्यात २३ लाख १६ हजार ५१५ मतदार आहेत. त्यात पुरूष मतदारांची संख्या ११ लाख ७८ हजार ५५ इतकी आहे, तर महिला मतदारांची संख्या ११ लाख ३८ हजार ३७८ इतकी आहे. शिवाय रायगडमध्ये ८२ तृतीयपंथी मतदार आहेत. ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेले ३७ हजार ७३६ मतदार आहेत. जिल्ह्यात ११ हजार २८२ दिव्यांग मतदार आहेत. २४ हजार १७७ मतदार हे १८ ते १९ वयोगटातील आहेत. दिव्यांग मतदारांसाठी मतदान केंद्रावर रॅम्प तसेच व्हिलचेअरची व्यवस्था असेल तर ८५ वर्षांपेक्षा अधिक वय असणाऱ्या मतदारांना घरी बसून मतदानाचा हक्क बजावता येणार आहे, अशी माहिती रायगडचे जिल्हााधिकारी किशन जावळे यांनी या पत्रकार परिषदेत दिली.

रायगड जिल्ह्यातील सातपैकी कर्जत, उरण आणि पनवेल या तीन विधानसभा मतदारसंघांचा मावळ लोकसभा मतदारसंघात समावेश होतो. अलिबाग, पेण, महाड आणि श्रीवर्धन तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली व गुहागर असे एकूण सहा विधानसभा मतदारसंघ मिळून रायगड लोकसभा मतदारसंघ आहे. या रायगड लोकसभा मतदारसंघात एकूण १६ लाख ५३ हजार ९३५ मतदार आहेत. यात पुरूष मतदारांची संख्याल आठ लाख १३ हजार ५१५ आहे तर स्त्री मतदारांची संख्या आठ लाख ४० हजार ४१६ आहे. शिवाय चार तृतीय पंथी मतदार आहेत. पुरूष मतदारांच्यार तुलनेत महिला मतदारांची संख्या २६ हजार ९०१ने अधिक आहे.

जिल्ह्यात दोन हजार ६९४ मतदान केंद्र असून त्यातील केवळ सहा मतदान केंद्र संवेदनशील आहेत, तर रायगड लोकसभा मतदारसंघात दोन हजार १८५ मतदान केंद्र आहेत. जिल्ह्यात निवडणूक आयोगाने सात हजार ५२ मतदान यंत्रे, चार हजार ४५ कंट्रोल युनिट आणि चार हजार २२२ व्हीव्हीपॅट यंत्रे उपलब्ध करून दिली आहेत.

संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याचसाठी १३ हजार ५०० कर्मचाऱ्यांची गरज बसून जिल्ह्यात २७ हजार कर्मचारी उपलब्ध असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.

### पोलीस यंत्रणेची तयारी

**निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी पार पाडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज आहे. अमली पदार्थ, रोख रकमेची वाहतूक, वाटप, दारूचे वाटप, वाहतूक यावर पोलिसांची नजर राहणार आहे. शस्त्र परवाना असलेल्या व्यक्तींकडून शस्त्रास्त्रे जमा केली जाणार असल्याची माहिती पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी या वेळी दिली.**

# वडखळमध्ये जेएसडब्ल्यू फाउंडेशनतर्फे पाणी साठवण टाकी

**पेण : प्रतिनिधी**

वडखळ येथे जेएसडब्ल्यू फाउंडेशन सीएसआर डोलवी अंतर्गत पाच लाख लिटर क्षमतेच्या पाणी साठवण टाकीचे भूमिपूजन कॅप्टन राजेश कुमार रॉय यांच्या हस्ते करण्यात आले.

कॅप्टन राजेश कुमार रॉय म्हणाले की, या परिसरामध्ये घनकचरा व्यवस्थापनाचा प्रकल्प आणण्याचा मानस कंपनी प्रशासनाचा आहे, मात्र स्थानिक ग्रामपंचायतीने आम्हाला मदत करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर स्थानिकांची मानसिकताही बदलणे गरजेचे आहे आणि ते बदलविण्यासाठी आम्ही पुरेपूर प्रयत्न करीत आहोत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी सरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य योगेश पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन निलेश म्हात्रे यांनी केले.

वडखळ बोरी फाटा येथे प्रथम विधीवत टाकीचे भूमिपूजन करून कॅप्टन राजेश कुमार रॉय यांच्या हस्ते टिकाव मारून कामाला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर वडखळ ग्रामपंचायतीमार्फत जेएसडब्ल्यू कंपनीचे आलेले अधिकारी सिनियर व्हाईस प्रेसिडेंट ॲडमिन, सिक्युरिटी, लिगल कॅप्टन राजेश कुमार रॉय, असोसिएट व्हाईस प्रेसिडेंट जनसंपर्क विभाग आत्माराम बेटकेकर, सीएसआर हेड सुधीर तेलंग, कुमार थत्ते, गणेश बोडके, सुशांत वडवल आदींचे स्वागत करण्यात आले. या वेळी उपसरपंच मत्स्यगंधा म्हात्रे, सदस्य योगेश पाटील, निलेश म्हात्रे, नुतन म्हात्रे, सुनील जांभळे, मिलींद मोकल, विनोदिनी कोळी, योगिता मोकल, संजय पवार, प्रभाकर म्हात्रे, प्रकाश म्हात्रे, संदेश गायकवाड, सचिन म्हात्रे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.




# खोपोलीत पाणीगळतीने अनेक भागांत टंचाई



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरातील काही भागात दिवसेंदिवस पाणीटंचाई वाढत आहे. पाणीगळती रोखण्याचा प्रयत्न झाल्यास याही भागात पुरेसा पाणीपुरवठा होईल, असा अहवाल आहे, मात्र पालिका पाणीपुरवठा विभाग व प्रशासनाचे याकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांमधून होत आहे.

शहरातील विणानगर, आशियाना इस्टेट, ड्रीमलँड, काटरंग, मोगलवाडी, शीळफाटा, यशवंत नगर, लौजी, ताकई व अन्य काही रहिवासी भागात मार्च महिन्यापासून पाणीटंचाई सुरू झाली आहे. त्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत.

तीन वर्षांपूर्वी पालिकेने केलेल्या ऑडिट अहवालनुसार खोपोली पाणीपुरवठा यंत्रणेतून एकंदरीत ३५ टक्के शुद्ध केलेले पाणी गळती होऊन वाया जात आहे. ही गळती १० टक्केपेक्षा कमी आणता येऊ शकते, असे सूचविण्यात आले आहे, मात्र याकडे पालिकेचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिक करीत आहेत.

**असे आहे पाण्याचे गणित**

***पाणी उपसा, वहन, शुद्धीकरण व वितरणासाठी वार्षिक खर्च साधारण तीन कोटींच्या जवळपास आहे. दुसरीकडे सद्यस्थितीत उत्पन्न मात्र दोन कोटी १५ लाखांच्या आसपास आहे. त्यामुळे पाणीपुरवठा विभागाची एकंदरीत तूट वर्षाला ८० ते ८५ लाख एवढी निर्माण झाली आहे. पाणीगळती रोखण्यासाठी कसोशीने प्रयत्न झाल्यास पालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील वार्षिक ८५ लाख रुपयांची आर्थिक तूट कमी होऊ शकते.***

**गळती रोखण्यासाठी पालिकेकडून तातडीने कार्यवाही होण्याची गरज आहे. गळती कमी झाल्यास अनेक भागातील पाणीटंचाई दूर होईल व आर्थिक तूटही कमी होईल**

**–मिलिंद चव्हाण, रहिवासी विणानगर**

**गळती रोखण्यासाठी पाणीपुरवठा विभागात विशेष पथक कार्यान्वित आहे. वितरण यंत्रणेतही सुधारणा सुरू आहेत. नागरिकांनी गळतीबाबत सूचना किंवा गळती लक्षात आणून दिल्यास त्याबाबत तातडीने कार्यवाही केली जाते.**

**–पंकज पाटील, मुख्याधिकारी**

# बेकायदेशीर प्रवासी ॲप बंद करण्याची परिवहन विभागाची सूचना

**खालापूर : प्रतिनिधी**

प्रवासी वाहतुकीचा व्यवसाय करण्यासाठी केंद्र सरकारकडून अनुमती न घेता बेकायदेशीर ग्रीगेटरचा व्यवसाय करणाऱ्या मेक माय ट्रीप, रेड बस, गोआयबिबो, सवारी, इन ड्राईव्ह, रॅपीडो, क्वीक राईड, रॅपीडो अशा एकूण १८ खासगी प्रवासी ॲप बंद करण्याची सूचना पुणे येथील प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी ६ मार्च २०२४ या दिवशी महाराष्ट्र सरकारकडे केली आहे.

या संदर्भात हिंदू जनजागृती समितीच्या सुराज्य अभियानाच्या वतीने गेली चार वर्षे वारंवार पाठपुरावा करून प्रवाशांची लूट करणाऱ्या या प्रवासी ॲप, तसेच ट्रॅव्हल्स कंपन्यांवर कारवाईसाठी अनेक आंदोलने केली, तक्रारी केल्या.

कोट्यवधी प्रवाशांची लूट करणाऱ्या या बेकायदेशीर ग्रीगेटर ॲपचे विशेष लेखापरिक्षण करावे, या कंपन्यांना मोठा आर्थिक दंड ठोठवावा आणि त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी हिंदू जनजागृती समिती समन्वयक अभिषेक मुरुकटे यांनी सरकारकडे केली आहे.

# वडगाव राजिप शाळेत शिक्षण परिषद




**चौक : प्रतिनिधी**

माजगाव केंद्राची शिक्षण परिषद राजिप शाळा वडगाव येथे झाली. त्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून बिर्ला कार्बन कंपनीचे सीएसआर प्रमुख लक्षुमन मोरे उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन केंद्र प्रमुख जे. पी. परदेशी यांनी प्रशासकीय विषय आणि नवभारत साक्षरता अभियान राबविण्यासंदर्भात मार्गदर्शन करून वडगाव शाळेचे कौतुक केले.

या वेळी पत्रकार अर्जुन कदम, शाळेचे मुख्याध्यापक किरण कवाद, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष करुणा ठोंबरे, उपाध्यक्ष राजश्री जांभूळकर, प्रा. डॉ. सागर ससाणे खोपोली यांच्या प्रमुख उपस्थितीत आनंददायी वातावरणात परिषद झाली.

केंद्रस्तरीय शालेय गुणवत्ता क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल राजिप शाळा वाशिवली ठाकूरवाडी शाळेच्या शिक्षकांचे व राजिप शाळा वडगावला क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले, तसेच रायगड जिल्हा महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेतर्फे वैजनाथ जाधव शाळा वडगाव यांना आदर्श पुरस्कार मिळाल्याबद्दल सन्मानित करण्यात आले.

शिक्षण परिषदेत सर्व महिलांचा जागतिक महिला दिनाच्या औचित्याने सन्मान करण्यात आला. तज्ज्ञ मार्गदर्शक किरण कवाद, सुभाष राठोड, भूषण पिंगळे, दीपक अकोलकर, मस्तान बोरगे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन किरण कवाद व सुभाष राठोड यांनी केले. तर आभार दीपक अकोलकर यांनी मानले.

# हिरवळ महाविद्यालयात अंधश्रद्धा निर्मूलन प्रदर्शन

**माणगाव : प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सायन्सच्या विद्यमाने विज्ञान दिनाचे औचित्य साधून विज्ञान प्रदर्शन व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती यांच्यामार्फत अंधश्रद्धा निर्मूलन प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून अंनिस जिल्हा कार्याध्यक्ष संदीप गायकवाड, अंनिस जिल्हा प्रशिक्षण विभाग कार्यवाहक मनोहर तांडेल, अंनिस खोपोली कार्याध्यक्ष महेंद्र वोव्हाळ, अंनिस सांस्कृतिक विभाग कार्यवाहक तेजल खेडेकर, अंनिस पनवेल प्रधान सचिव महेंद्र नाईक, संचालिका सोनाली धारिया, मुख्य सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी, युवा अस्मिता फाउंडेशनचे अध्यक्ष कुणाल चव्हाण उपस्थित होते.





अर्जदारांचे वकिल
ॲड. नित्यानंद राम ठाकूर
मु. कोपर, पो. गव्हाण, ता. पनवेल जि. रायगड.

**जाहिर नोटीस**

नि. ०७/ड
ने.ता. ०५/०४/२०२४
दिवाणी ची. अर्ज १८०/२०२४

**पनवेल येथील मे दिवाणी न्यायाधीश व./क. स्तर साहेब यांचे न्यायालयात**

१. श्री. रामदास सावळाराम ठाकुर
वय : ७७ वर्षे, व्यवसाय : काहीनाही
२. श्री नरेश रामदास ठाकुर
वय : ५२ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३. श्री. सदानंद रामदास ठाकुर
वय : ४९ वर्षे, व्यवसाय: मासेमारी
४. श्री. दिनेश रामदास ठाकुर
वय : ४८ वर्षे, व्यवसाय : धंदा
वरील १ ते ४ रा. मु. कोपर पो. गव्हाण
ता. पनवेल जि. रायगड पिन नं. ४१०२०६.
५. रंजना रामदास ठाकुर उर्फ
सौ. रंजना दिपक पाटील
वय : ४६ वर्षे, व्यवसाय : गृहीणी
मु. उलवे, पो. उलवे ता. पनवेल
जि. रायगड. पिन नं. ४१०२०६.
६. श्री. विलास रामदास ठाकुर
वय : ४४ वर्षे, व्यवसाय : धंदा
७. श्री. नामदेव रामदास ठाकुर
वय : ४३ वर्षे, व्यवसाय : मासेमारी
वरील ६ ते ७ रा. मु. कोपर पो. गव्हाण
ता. पनवेल जि. रायगड. पिन नं. ४१०२०६.
अर्जदार

**विरूध्द**

कुणीही नाही — सामनेवाले

सर्व लोकांना या जाहिर नोटीशीने कळविण्यात येत आहे की सदरहु अर्जदार वारस दाखला मिळण्यासाठी मे. कोर्टात अर्ज दाखल करत आहेत. अर्जदार नं. १ ची पत्नी आणि अर्जदार नं.२ ते ७ यांची आई कै. राधाबाई रामदास ठाकुर हया ०८.०८.२०२३ रोजी मु. कोपर, पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड येथे मयत झाल्या आहेत. अर्जदार हे कै. राधाबाई रामदास ठाकुर यांचे वारस आहेत.
मयत कै. राधाबाई रामदास ठाकुर यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन
**खालीलप्रमाणे मिळकत नं. १ मौजे न्हावे, ता. पनवेल, जि. रायगड.**

| युनिट केस नं | सर्वे नं हिस्सा नं | हे. क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| १ | अ ४१८ | ०.३६.४ | १.५६ |
| | अ १०४५ | ०.६२.३ | ६.८७ |

कै. राधाबाई रामदास ठाकुर हयांच्या नावावर खालील वर्णनाचा बँक खाता आहे

**मिळकत नं. २ खात्याचे वर्णन**

| बँकेचे नाव | खाता नंबर | शाखा |
|---|---|---|
| बँक ऑफ महाराष्ट्र | ६०३११०३३३१२ | पनवेल |

सदर मिळकतीबावत कै. राधाबाई रामदास ठाकुर यांचे कायदेशिर वारस असल्याचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर बारस दाखल्याच्या कामी कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत मे. कोर्टात दाखल कराव्यात मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारसदाखला दिला जाईल यांची नोंद घ्यावी.
आज ता.१२/०३/२०२४ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिला.

**सही/-**
**क. लिपीक**
**दिवाणी न्यायालय**
**कनिष्ठ स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सह. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**कनिष्ठ स्तर, पनवेल**


# पेण खारेपाट विभागाचा पाणीप्रश्न लवकरच मार्गी

**पेण : प्रतिनिधी**

पेण खारेपाट विभागातील नागरिकांचा पाणीप्रश्न लवकरच मार्गी लागणार असून ७६६ कोटी रुपयांचा निधी खारेपाटसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

या वेळी पेण तालुका राष्ट्रवादीचे अध्यक्ष दयानंद भगत यांनी मंजुरीची रक्कम महाराष्ट्र शासनाची जलसंपदा विभाग सुप्रमा खारेपाट विकास संकल्प संघटना प्रकाश माळी व संघटनेच्या पदाधिकारी यांच्याकडे सुपूर्द केली. या वेळी वाशी खारेपाट विभागातील जनतेने वाशी ग्रामपंचायत कार्यालयासमोर जल्लोष करण्यात आला.

या वेळी महिला तालुकाध्यक्ष चैताली पाटील, ज्येष्ठ नेते बंड्याशेठ पाटील, विद्यार्थी तालुकाध्यक्ष साजन पाटील, वडखळ जि. प. मतदारसंघ अध्यक्ष राजेंद्र वर्तक, सचिव सी. आर. म्हात्रे, उपोषणकर्ते नंदा म्हात्रे, हेमंत पाटील, अजित पाटील, अभिमन्यू म्हात्रे, स्वप्नील म्हात्रे, जितेंद्र ठाकूर, मार्गदर्शक राजन झेमस महेंद्र ठाकूर, राजेंद्र म्हात्रे, दिलीप पाटील, संदीप म्हात्रे, कल्पेश म्हात्रे, संदेश पाटील, मनीषा थवई, संजीवनी पाटील, चंद्रहास म्हात्रे आदी उपस्थित होते.




MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | E-Tender-25/ 23-24/ 7000030690 | E-tender for supply of various material required for maintenance of switchyard Nagothane under 400 KV RS (O&M) Dn. Nagothane under EHV (O&M) Circle, Panvel | Rs. 1.59 Lakh | 22.03.2024 up to 23.59hrs |

**EMD 1% of estimate cost i.e. Rs. 25,000/-** for Sr. No. 1 and Rs. 5000/- for Sr. no. 3 & Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: Mitesh Goyal (DY.EE) Mob No. 9461456635 Email ID: ee7230@mahatransco.in Note: All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

# नवी मुंबईत गावांचा विकास वेगात

## शिरवणे गाव होणार स्मार्ट व्हिलेज; कै. बनूबाई घरत मासळी मार्केटचे नूतनीकरण



**नवी मुंबई : बातमीदार**

शिरवणे गावातील विविध नागरी विकास कामे पूर्ण करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. याचा एक भाग म्हणुन सर्व सुविधायुक्त कै. बनूबाई घरत मासळी मार्केटचे नव्याने नूतनीकरण करण्यात आले असून शिरवणे गाव स्मार्ट व्हिलेजच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे माजी महापौर जयवंत सुतार यांनी शिरवणे येथे बोलताना सांगितले.

शिरवणे गावात मासळी विक्रेत्या महिलांना मासळी विक्रीसाठी सुसज्ञ आणि सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून सुमारे ७० लाखा रुपये खर्च करून. कै. बनूबाई घरत मासळी मार्केट नागरिकांना उपलब्ध करण्यात आले आहे. मासळी विक्रेता आणि ग्राहक यांची कोणत्याही प्रकारे गैरसोय होऊ नये अशा पद्धतीने सदर मार्केट मधील ओटे बांधण्यात आले आहेत. या मार्केट मध्ये ७५ ओटे बांधण्यात आले आहेत. इथ पंखा, विद्युत, ड्रेनेज आदी व्यवस्था करण्यात आली आहे. अशा सर्व सुविधांयुक्त कै. बनूबाई घरत मासळी मार्केटचे उद्घाटन माजी महापौर जयवंत सुतार यांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले.

या वेळी शिरवण ग्रामस्थ विकास मंडळाचे अध्यक्ष डॉ राजेश पाटील, माजी नगरसेवक काशिनाथ पाटील, निर्मला सुतार, अरुणा भोईर आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी सर्व महिलांनी मार्केट पाहून आनंद व्यक्त केला.

## बेलापूर गावाचा होणार कायापालट; कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांचे चित्रफितीद्वारे सादरीकरण

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या माध्यमातून बेलापूर गावाचा कायापालट करण्यासाठी तेथे विकासकामांचे शुक्रवारी (दि. १५) सादरीकरण चित्रफितीद्वारे करण्यात आले. बेलापूर ग्रामस्थांनी मला प्रत्येक वेळी साथ दिली असून कर्तव्य भावनेतून मी आपल्या अपेक्षा पूर्ण करेन, अशी ग्वाही आमदार मंदा म्हात्रे यांनी बोलताना दिली.

आमदार मंदा म्हात्रे यांच्या माध्यमातून बेलापूर गाव अंतर्गत भव्य सर्व सुविधांयुक्त तरुणांना खेळण्याकरिता स्टेडियम, चार मजली वाहनतळ, बहउद्देशीय इमारत, भाजी व फळ मार्केट, ग्रंथालय, तरुणांसाठी जिम, बॅडमिंटन प्रशिक्षण केंद्र, तलाव सुशोभीकरण, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र, लग्न समारंभासाठी हॉल तसेच सुशोभीकरण करण्यात येणार आहे. याकरिता आमदार निधीची तरतूदही करण्यात येणार आहे. बेलापूर गावचा कायापालट होणार असून स्थानिकांना रोजगार मिळणार आहे. याच अनुषंगाने चांगले शिक्षण, आरोग्य सुदृढ होण्यास मदत मिळणार आहे. स्वच्छता व सार्वजनिक उपक्रमाला चालना मिळणार आहे. या वेळी गावातील ग्रामस्थांनी बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांचे मनापासून आभार मानले.

माजी विरोधी पक्षनेता पंढरी पाटील, राममंदिर संस्था अध्यक्ष चंद्रकांत पाटील, नारायण मुकादम, महादेव पाटील, रवींद्र म्हात्रे, बाळकृष्ण बंदरे, शैलजा पाटील, ज्योती पाटील, प्रियांका म्हात्रे, संदेश पाटील, मनोज म्हात्रे, प्रकाश मुकादम, वैभव मुकादम तसेच बेलापूरमधील असंख्य नागरिक या वेळी उपस्थित होते.



# माथाडी कामगारांच्या सतर्कतेमुळे नवी मुंबईत महिलेचा जीव बचावला

## घटना सीसीटीव्हीमध्ये कैद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील एपीएमसी मार्केटमधील धान्य मार्केटमध्ये एक महिला साफ सफाई करताना अचानक महिलेच्या अंगावर गोण्यांचा ढीग कोसळला. सफाई करणाऱ्या महिलेचे लक्ष नसल्याने या गोण्या महिलेच्या अंगावर पडल्याने ही महिला या गोण्यांच्या खाली दाबल्याने या महिलेच्या हाताला गंभीर दुखापत झाली आहे.

माथाडी कामगारांनी वेळीच धाव घेतल्याने या महिलेचा जीव वाचविण्यास यश आले आहे. तसेच जखमी महिलेला ताबडतोब माथाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेचा व्हिडिओ सीसीटीव्हीमध्ये कैद झाला आहे.

दरम्यान, नवी मुंबईतील धान्य मार्केटमध्ये काल एक धक्कादायक प्रकार घडताना दिसला. एक महिला सफाई कर्मचारी सफाई करत असताना अचानक तिच्या शेजारी असणाऱ्या गोणींची थप्पी अंगावर कोसळली. तिथे उपस्थित असलेल्यांचा काळजाचा ठोका चुकला. एवढ्या वजणाच्या गोण्या महिलेच्या अंगावर कोसळल्या असल्याने महिला जिवंत राहत नाही, असे सर्वांना वाटले, मात्र समयसुचकता राखून तिथे काम करत असलेल्या माथाडी कामगारांनी धाव घेत



पटापट एक-एक करत सर्व गोण्या बाजूला केल्या आणि त्या महिलेचा जीव वाचवला.

महिलेला जिवंत बघून सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला. या घटनेत महिलेच्या हाताला गंभीर दुखापत झाली आहे. हा सर्व प्रकार तिथे असलेल्या सीसीटीव्हीमध्ये कैद झाला आहे.

## नेरूळमध्ये कृतज्ञता पुरस्कारांचे वितरण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबईच्या नवी मुंबई केंद्राच्या वतीने कृतज्ञता पुरस्कार प्रदान समारंभ सोहळा शनिवारी (दि. १६) नेरूळ येथील स्टर्लिंग महाविद्यालयाच्या सभागृहात झाला. या वेळी नवी मुंबई महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले, नवी मुंबई केंद्राचे अध्यक्ष प्रमोद कर्नाड, सचिव अशोक पाटील आदी उपस्थित होते.

या वेळी तीन संस्था व १० व्यक्तींना 'कृतज्ञता पुरस्कार २०२४' देऊन गौरविण्यात आले. अन्वय व्यसनमुक्ती केंद्र वाशी, के. गो. लिमये वाचनालय व ग्रंथालय, चाईल्ड फाऊंडेशन नेरूळ या संस्थांसह अनेकांचा सन्मान करण्यात आला.

# वृद्ध महिलेचे मंगळसूत्र खेचणारा लुटारू अटकेत

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**




महिलेच्या गळ्यातील एक लाख रुपये किमतीचे मंगळसूत्र घेऊन पळून जाण्याच्या प्रयत्नात असणाऱ्या चोराला प्रवाशांनी पकडल्याची घटना सोमवारी मध्यरात्री सानपाडा रेल्वे स्थानकात घडली. सरताज मोहम्मद मनीर शाह (वय २४) असे या चोराचे नाव आहे. त्याला अटक करून मंगळसूत्र हस्तगत करण्यात आले आहे.

सानपाडा सेक्टर-१६ मध्ये राहणाऱ्या शोभा कोठावदे (वय ६४) या सोमवारी (दि. ११) पती प्रकाश कोठावदे यांच्यासोबत डोंबिवली येथे नातेवाइकांकडे गेल्या होत्या. कार्यक्रम संपल्यानंतर कोठावदे दाम्पत्य मध्यरात्री सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास डोंबिवली येथून लोकलने सानपाडा रेल्वे स्थानकात आले होते.

हे दाम्पत्य रेल्वे स्थानकातील पायऱ्या उतरून सबवेमधून बाहेर पडत असताना, त्यांच्या पाठीमागून आलेल्या सरताजने शोभा यांच्या गळ्यातील सुमारे एक लाख रुपये किमतीचे मंगळसूत्र खेचून पलायन केले. शोभा यांनी आरडाओरड केल्यानंतर सानपाडा रेल्वे स्थानकात साध्या वेशात असलेल्या पोलिसांनी प्रवाशांच्या मदतीने सरताज शाह याला पकडले.

# चिमुकलीवर लैंगिक अत्याचार

## नराधम अटकेत; गुन्हा दाखल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

एका तीन वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचा प्रकार उरण परिसरात उघडकीस आला आहे. या प्रकरणी आरोपीविरोधात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

३० वर्षीय आरोपी हा विवाहित असून त्याची पत्नी व लहान मुलगा गावी राहतात. खासगी वाहनावर चालक असल्याने तो उरण भागात बहिणीसोबत राहतो. आरोपीची बहीण शेजारी राहणाऱ्या तीन वर्षांच्या मुलीला घरी खेळण्यासाठी आणत असे. शुक्रवारी खेळण्याच्या बहाण्याने आरोपीने लहानगीला आपल्याजवळ घेतले आणि लैंगिक अत्याचार केला. या प्रकाराने घाबरलेली लहान मुलगी घरी गेल्यानंतर गुपचूप बसली. आईने विचारपूस करूनही तिने सांगितले नाही.

मुलीच्या आईने रुग्णालयात नेऊन तिची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचे उघड झाले. शेजारी राहणाऱ्या तरुणाने हे कृत्य केल्याचे उघड झाल्यानंतर पीडितेच्या आईने पोलीस ठाण्यात याची तक्रार केली. न्यायालयाने १९ मार्चपर्यंत आरोपीला पोलीस कोठडी सुनावली आहे.

# ऐरोलीत साकारणार शिवस्मारक

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते कामाचे भूमिपूजन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ऐरोली सेक्टर दहा येथे साकारण्यात येणारा छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३६ फुटी पूर्णाकृती पुतळा व ऐतिहासिक संग्रहालयाच्या कामाचे भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ऑनलाईन करण्यात आले.

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विजय चौगुले यांनी शिवस्मारकासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा करून भूखंड मिळवून घेतला होता. शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याबरोबरच शिवकालीन इतिहासाची नव्या पिढीला ओळख व्हावी अशा पद्धतीचे शस्त्र, नाणी, मोडी लिपीतील माहिती देणारे पत्र आणि शिवकालीन दालन या शिवस्मारकात साकारण्यात येत आहे. नवी मुंबईच्या प्रवेशद्वारावर असणाऱ्या ऐरोली येथे एमएमआर क्षेत्रातील आणि राज्यातील पहिले भव्यदिव्य



शिवस्मारक म्हणून याची नोंद होईल, असा विश्वास व्यक्त करत जिल्हाप्रमुख चौगुले यांनी शिवस्मारकासाठी मुख्यमंत्री शिंदे यांनी केलेल्या सहकार्याबद्दल शिवप्रेमी आणि नवी मुंबईकरांच्या वतीने आभार मानले.

ऐरोली येथे जिल्हाप्रमुख विजय चौगुले व युवानेते ममीत चौगुले आणि मान्यवरांनी श्रीफळ वाढवून शिवस्मारकाचे भूमिपूजन केले. या वेळी ढोल-ताशा पथक, शालेय विद्यार्थ्यांचे लेझीम आणि शिवकालीन शस्त्रांच्या प्रात्यक्षिकांनी सर्वांना भारावून टाकले; तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेशभूषेतील महाराज आणि मावळे सर्वांना आकर्षित करीत होते.

### आमदार नाईकांकडून ५० लाखांचा भरीव निधी

नवी मुंबई महापालिकेतील विविध प्रकल्पांचे भूमिपूजन आणि लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पार पडले. या वेळी ऐरोलीत उभारण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचा शिलान्यास देखील करण्यात आला. या शिवस्मारकाच्या कामासाठी आमदार गणेश नाईक यांनी ५० लाख रुपयांचा भरीव निधी दिला आहे. ऐरोली येथे शिवस्मारक उभं राहत असल्याने ऐरोलीकरांनी आनंद व्यक्त केला आहे.

# केबीपी कॉलेजमध्ये विद्यार्थिनींना मार्गदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेजमध्ये महिला सक्षमीकरण समितीच्या वतीने शनिवारी (दि. १६) महिला दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मराठी अभिनेत्री समिरा गुजर जोशी उपस्थित होत्या. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या अभिनेत्री समिरा गुजर यांनी मंत्रमुग्ध करणारे व्याख्यान



दिले. त्यांनी महिलांचा संघर्षमय प्रवास, कुटुंबातील तिचे स्थान आणि महत्त्व, जीवनाच्या सर्वच क्षेत्रातील महिलांच्या वेगवेगळ्या भूमिका आणि योगदान याविषयी त्यांनी प्रतिपादन केले. कवयित्री बहिणाबाई चौधरी, लक्ष्मीबाई टिळक यांच्या साहित्यातील विविध उदाहरणे देऊन, महिलांनी आत्मनिर्भर बनले पाहिजे, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या दरम्यान विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा गौरव महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये पत्रकार सोनाली शिंदे, सायली पांचाळ (हस्तकला) प्रज्ञा लळिंगकर (उदयोग), मृणाली धुमाळ (क्रीडा) आणि दीपा कांबळे यांचा शाल, सन्मानचिन्ह व ग्रंथ देऊन सन्मान करण्यात आला.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांच्या मार्गदर्शनातून या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चेअरमन मानसी रसाळ, पाहुण्यांचा परिचय उपप्राचार्य डॉ. राजेश्री घोरपडे आभार डॉ. हर्षा गोयल यांनी तर सूत्रसंचालन प्रा. माया कळविकट्टे, प्रा. ज्योत्सना भोईर यांनी केले. कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## पलवीत फाउंडेशनचे स्नेहसंमेलन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

समाजातील दुर्लक्षित घटक असणाऱ्या गतिमंद मुलांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कार्यरत असणाऱ्या पलवीत फाउंडेशनचे वार्षिक स्नेहसंमेलन वाशीतील साहित्य मंदिर सभागृह येथे शनिवारी (दि. १६) माजी उपमहापौर अशोक गावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात झाला.




या वेळी माजी उपमहापौर अशोक गावडे यांनी गतिमंद मुलांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या संस्था चालकांचे आपल्या भाषणात कौतुक करून सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या वेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रतेश बारवे, शुभम भालेराव, पलवीत फाउंडेशनचे सर्व सहकारी पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फळांच्या मागणीत वाढ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

उन्हाळ्यासह आता रमजान महिन्यालाही सुरुवात झाल्याने फळांच्या मागणीत वाढ झाली आहे. त्यामुळे घाऊक बाजारात फळांची आवक वाढली आहे. मागणी वाढल्याने पर्यायाने फळांच्या दरातही वाढ झाली आहे.

यावर्षी उन्हाचा तडाखा लवकर सुरू झाला आहे. तडाखा वाढू लागल्यापासून फळांना मागणी वाढली आहे. फळांचे रस तयार करण्यासाठीही फळांना मागणी आहे. त्यातच रमजान हा उपवासाचा महिना सुरू झाल्यामुळे कलिंगड, टरबूज, अननस, पपई यांसारख्या रसदार फळांना अधिक पसंती दिली जात आहे. त्यामुळे वाशीच्या घाऊक बाजारात सध्या कलिंगडाच्या ४० ते ५० गाड्यांची आवक दररोज होत आहे; तर टरबूज, पपईच्याही सरासरी ४० गाड्या दररोज येत आहेत.

द्राक्षांचा हंगाम अखेरच्या टप्प्यात असल्याने बाजारात गोड द्राक्षे येत आहेत आणि त्यांचे दरही स्थिर आहेत. रमजानमुळे द्राक्षांनाही मागणी आहे.



**बाजारातील दर**

फळ दर (रुपयांत)

**कलिंगड** - १५
**खरबुज** - १० ते १२
**पपई** - १५ ते २०
**द्राक्षे** - १०० ते १२०
**डाळिंब** - १८० ते २००
**सफरचंद** - १५० ते २००
**अननस** - ५० ते ६० रु. नग

# सीकेटी महाविद्यालयात राष्ट्रीय परिसंवाद उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे महाविद्यालयातील अर्थशास्त्र, भूगोल आणि ग्रामीण विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. १६) एक दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

परिसंवादासाठी भारतातील विविध विद्यापीठातील आणि महाविद्यालयातील मान्यवर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठातील कला शाखेचे अधिष्ठात प्रा.डॉ. अनिल वावरे होते. मुंबई विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे प्राध्यापक आणि अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सुरेश मैंद, मुंबई विद्यापीठातील भूगोल विभागाच्या प्राध्यापिका आणि विभाग प्रमुख प्रा. डॉ. संजुक्ता सत्तार, अप्लाइड एन्व्हायर्नमेंटल रिसर्च फाउंडेशन, कोथरूड, पुणे संचालिका डॉ. अर्चना गोडबोले आणि लोकसंख्या विज्ञान आंतरराष्ट्रीय संस्थेच्या विस्थापन विभागाचेप्राध्यापक आणि विभाग प्रमु प्रा. डॉ. कैलास दास यांची सुद्धा उपस्थीती लाभली होती. प्राचार्य प्रा.डॉ.एस.के. पाटील, अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. बाळासाहेब पाटील, भूगोलविभागाचे प्रमुख डॉ. दीपकनारखेडे वग्रामीण विकासविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. स्मिता भोईर यांची उपस्थिती लाभली.



प्राचार्य प्रा.डॉ.एस.के.पाटील यांनी महाविद्यालयाच्या घडामोडीवर प्रकाश टाकला. प्रस्तावना प्रा. डॉ. बाळासाहेब पाटील यांनी केली. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. अनिल वावरे यांनी भारताच्या दरडोई उत्पन्नाची स्थिती, सरकारची समग्रलक्षी धोरणे तसेच लोकसंख्या वाढीचे अर्थव्यवस्थेवरील परिणाम या घटकांवर प्रकाश टाकला. अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सुरेश मैंद यांनी भारत, चीन आणि अमेरिका या देशांचा दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत तुलनात्मक आढावा घेतला आणि यावर उपाय सुचविले. मुंबई विद्यापीठातील भूगोल विभागाच्या प्राध्यापिका आणि विभाग प्रमुख प्रा. डॉ. संजुक्ता सत्तार यांनी मानव आणि पर्यावरण यांच्यातील संबंध या घटकावर भाष्य केले. अप्लाइड एन्व्हायर्नमेंटल रिसर्च फाउंडेशन, कोथरूड, पुणेसंचालिका,मा. डॉ. अर्चना गोडबोले यांनी पर्यावरण संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन केले. लोकसंख्या विज्ञान आंतरराष्ट्रीय संस्थेच्या विस्थापन विभागाचे प्राध्यापक आणि विभाग प्रमुख प्रा. डॉ. कैलास दास यांनी देशाच्या एकूण विकासामध्ये पर्यावरण संवर्धन या घटकाचे महत्त्व सांगितले.

मुंबई विद्यापीठातील भूगोल अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. राजाराम पाटील व मुंबई विद्यापीठातील ग्रामीण विकास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. डी. बी. पवार यांनी सहभाग घेतला. या परिसंवादाचे आयोजन प्रा. डॉ. बाळासाहेब पाटील, डॉ. दीपक नारखेडे व प्रा. डॉ. स्मिता भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. परिसंवादासाठी शिक्षक आणि शिक्षेत्तर कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली.

सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभागाचे प्रा. आकाश पाटील यांनी व आभार प्रदर्शन व्यावसायिक अर्थशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. अजय दिक्षित यांनी मानले.

## निवडक

### लायन्स क्लबतर्फे शिवणयंत्र वाटप



**अलिबाग** : लायन्स क्लब पोयनाडने ग्रामीण महिलांनी स्वयंरोजगार करून स्वत:च्या पायावर उभे राहावे, या हेतूने पाच गरजू ग्रामीण महिलांना लायन्स क्लब पोयनाडने शिवणयंत्र वाटप केले. लायन्स व्हिजन सेंटर, पोयनाड येथे शनिवारी (दि.१६) या शिवणयंत्रांचे वाटप करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून ओरिएंटल इन्शुरन्सचे वरिष्ठ अधिकारी संजय शिर्के, पनवेल ब्रँच मॅनेजर मिथिलेश चौबे, बिझनेस असोसिएट्स राजू शहा, गिरीश फडके, ओरिएंटल इन्शुरन्सचे मॅनेजर शंकर अय्यर, बिपीन नवसारीवाला, बी. डी. मोटा, लायन्स क्लब पेण प्राईडचे सचिव प्रदीप पाटील, लायन्स हेल्थ फाउंडेशन, चोंढीच्या सीईओ डॉ. शुभदा कुडतरकर, डॉ. हर्षल गोरे, सामाजिक कार्यकर्ता गंभीर पाटील, सुरेश पाटील, साहित्यिक उमाजी केळुसकर, लायन्स क्लब पोयनाडचे अध्यक्ष प्रमोद राऊत, प्रदीप सिनकर, प्रमोद पाटील, मनीष अग्रवाल, महेंद्र पाटील, अरविंद अग्रवाल, विकास पाटील, प्रगती सिनकर, ममता अग्रवाल आदी उपस्थित होते.

### रोशन चाफेकर यांचा सत्कार

**धाटाव** : सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. तालुक्यातील भिसे, मेढा, राजिवडे या भागात विविध सामाजिक उपक्रम गेल्या वर्षभरापासून राबविले जात असल्यामुळे सुराज्यचे संस्थापक रोशन चाफेकर व सुराज्यच्या टीमचा भिसे येथील सांस्कृतिक कार्यक्रमानिमित्त बुधवारी सत्कार करण्यात आला. गावातील नागरिकांनी या वेळी सुराज्यचे अध्यक्ष किरण कानडे, मेढा विभाग अध्यक्ष प्रविण ठमके, सचिव हाजी कोठारी, रिया कासार, अनिल घरजाळे, परेश चितळकर, राज कासार यांचा यथोचित सन्मान, गावातील सरपंच सुप्रिया ठमके, अनामिका ठमके, मुख्याध्यापक फड सर तसेच समस्त गावकरी यांनी मिळून केला.

### अलिबागमध्ये ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्ग

**अलिबाग** : रायगड जिल्हा ग्रंथालय संघातर्फे आणि सार्वजनिक वाचनालय अलिबाग यांचे संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्ष–२०२४, १ एप्रिल ते ३१ मे या दोन महिन्याचे कालावधीत अलिबाग येथील जेएसएम महाविद्यालय येथे होणार आहे. या ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्गाचे शैक्षणिक पात्रता एसएससी पास आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्गात सहभागी होण्याचे आवाहन रायगड जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संजय बोंद्रे आणि सार्वजनिक वाचनालय जिल्हा ग्रंथालय अलिबागचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांनी केले आहे. या ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्गाचे माहितीकरीता या वर्गाचे वर्ग व्यवस्थापक आणि सार्वजनिक वाचनालय व जिल्हा ग्रंथालयाचे ग्रंथपाल भालचंद्र वर्तक (९९२१५५१९५२) आणि रायगड ग्रंथालय संघाच्या प्रमुख प्रमुख कार्यवाह जिजा घरत (९८१९१९०७२३) यांच्याशी संपर्क साधावा.

# माणगावमध्ये पाणीटंचाई; उपाययोजनांची तयारी

## २४ गावे, ३२ वाड्यांना झळ



**माणगाव** : प्रतिनिधी

मार्च महिन्यापासून तालुक्यातील गावांना पाण्याचा प्रश्न भेडसावू लागला आहे. तालुक्यातील यंदाच्या वर्षी २४ गावे व ३२ वाड्यांतील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. पाणीटंचाई निवारणासाठी टँकरने पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने उपाययोजना आखली जात आहे.

यंदा मार्च महिन्यापासूनच काही गावातील नागरिकांची पाण्यासाठी पायपीट सुरू झाली आहे. दिवसेंदिवस उष्णता वाढू लागल्याने भूगर्भातील पाण्याची पातळी खालावू लागल्याने काही गावातील पाण्याचा प्रश्न अधिकच गंभीर बनत आहे. मार्च महिन्यापासून तालुक्यातील २४ गावे व ३२ वाड्यांतील नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. राजिवली, टीटवे, वडाचा कोंड, जांभूळमाळ, बोरमाच, केळगण, जोर, हरवंडी, उमरोली, बामनगाव, चाच, मांजुर्णे, माकटी, रुद्रवली, पोटणेर, नगरोली, तळेगाव तर्फे गोरेगाव, उसर बुद्रुक, उसरकोंड, पळसप, मूळगाव, हेदमलई, पळसगाव खुर्द, हरवंडी, साईकोंड ही २४ गावे तर हुंबरी धनगरवाडी, कुंभेवाडी, आंब्रेवाडी, उमरोली बौद्धवाडी, येरद आदिवासीवाडी, नीळज आदिवासीवाडी, मोरेवाडी, मशीद्वाडी बौद्धवाडी, कातळवाडी, उधळेकोंड, सोनारवाडी, मळ्याचीवाडी, मशीद्वाडी, शिरसाड बौद्धवाडी, शिलीम बौद्धवाडी, चांदे आदिवासीवाडी, कुंभार्ते आदिवासीवाडी, गौळवाडी, कुंभारवाडी, मोकाशीवाडी, तोंडलेकर वाडी, कातेवाडी, पळसगाव खुर्द आदिवासीवाडी, खारबाचीवाडी, पळसगाव खुर्द धनगरवाडी, उसर बुद्रुक बौद्धवाडी, पानसई आदिवासीवाडी, खर्डी आदिवासी वाडी या ३२ वाड्यांचा समावेश आहे.

तालुक्यात १४७ गावात जलजीवन मिशनची कामे चालू आहेत. त्यापैकी ५४ कामे पूर्ण झाली आहेत. ९३ कामे प्रगतिपथावर आहेत. शासनाच्या पाणीटंचाई आराखड्यात या गावांचा समावेश वर्षानुवर्षे करण्यात येत आहे. या गावांना दरवर्षी साधारण एप्रिल महिन्यात टँकरने पाणीपुरवठा करण्यात येतो, तसेच काही वाड्यात रस्ता नसल्याने बैलगाडीने पाणीपुरवठा केला जातो. पंचायत समिती कार्यालयाकडून हा शासनाकडे प्रस्ताव पाठवून पाणीटंचाई निवारणासाठी टँकरने पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने उपाययोजना आखली जात आहे.

# माणगावमध्ये मारहाण व धमकीप्रकरणी दोघांवर गुन्हा

**माणगाव** : प्रतिनिधी

माणगाव दत्तनगर येथे मारहाण व धमकी दिल्याप्रकरणी दोन आरोपींवर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल काण्यात आला आहे. ही घटना शनिवारी (दि.१६) रात्री ११.३० वा.च्या सुमारास घडली. या घटनेची फिर्याद सागर काशिनाथ दाते (वय २९, रा. डोंबिवली पूर्व) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.




पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, आरोपी राज वर्मा याला नाचताना डीजेवाला मुलाचा धक्का लागला. या गोष्टीचा आरोपी राज वर्मा व राहुल यांना राग येऊन डीजेवाला मुलास मारहाण केली. या वेळी फिर्यादी सागर दाते हे वाद सोडविण्यासाठी गेले असता दोन्ही आरोपींनी संगनमत करून फिर्यादींनाही मारहाण केली व ठार मारण्याची धमकी दिली. आरोपी राज वर्मा याने टोकदार वस्तूने फिर्यादींच्या डाव्या डोळयाजवळ मारून दुखापत केली.

माणगाव पोलीस ठाण्यात आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार सानप करीत आहेत.

# ठेकेदाराच्या मुकादमाला मारहाण

**खोपोली** : प्रतिनिधी

तालुक्यातील तांबाटी गावाचे हद्दीत टाटा मेमोरीयल कॅन्सर रुग्णालयाच्या बांधकामाचे ठिकाणी मुकादमाला स्थानिक महिलांनी मारहाण केल्याची घटना घडली आहे.

या ठिकाणी प्रिन्सीपल सिक्युरीटी एलाइट सर्विसेस प्रा.लि.खारघर यांच्याकडून बांधकाम मुकादम म्हणून काम करीत असलेल्या व्यक्तीला तांबाटी ठाकूरवाडी येथील महिलांनी, आमच्या जागेत काय करतोस, या ठिकाणी काम करायचे नाही, असे बोलून शिवीगाळी करून शनिवारी (दि.१६) दुपारी १.४५ वा.चे सुमारास मारहाण केली आहे. याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

# महायुतीच्या उमेदवाराला विजयी करू –आमदार महेंद्र दळवी

**रेवदंडा** : प्रतिनिधी



आगामी लोकसभा व ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चौलमध्ये परिवर्तनासाठी व महायुतीच्या उमेदवाराच्या विजयासाठी आमदार महेंद्र दळवी यांनी आवाहन केले.

चौल नाका येथे रेवदंडा–थेरोंडा, चौल–आग्राव, तसेच नागाव विभागातील महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांची सभा शुक्रवारी (दि.१५) आयोजित केली होती. या सभेत आमदार महेंद्र दळवी बोलत होते.

राष्ट्रवादी जिल्हा सचिव आशिष भट, रेवदंडा ग्रा.पं. संचालक व भाजप नेते सतीश लेले, शिवसेना तालुकाप्रमुख अनंत गोंधळी, राष्ट्रवादी महिला तालुकाध्यक्ष प्रतीक्षा राऊत, ज्येष्ठ नेते प्रवीण राऊत, शैलेश चव्हाण, बोर्ली सरपंच सपना जायपाटील, भाजपचे विश्वास जोशी, संकेत जोशी, भाजप शहराध्यक्ष प्रकाश दांडेकर, ज्येष्ठ नेते दिलीप पटेल, संकेत राउत, नागाव ग्रामपंचायत सदस्य अंकिता शेडगे, भाजपचे नेते माणिक बळी, ताराचंद कोंडे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार महेंद्र दळवी यांनी, आगामी लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवाराच्या विजयासाठी चौल, नागाव व रेवदंडा विभागातून भरघोस मताधिक्य मिळवून देण्याचे आवाहन केले. चौलच्या विकासासाठी आगामी ग्रामपंचायत निवडणुकीत परिवर्तन घडवा, असे आवाहन त्यांनी केले. सूत्रसंचलन विजय मानकर यांनी केले.

# दुचाकींची समोरासमोर धडक; तिघे जखमी

**पेण** : प्रतिनिधी

पेण ते वडखळ मार्गावर चुकीच्या दिशेने येणाऱ्या दुचाकीस्वाराने समोरून येणाऱ्या दुचाकीस धडक दिल्याने या अपघातात तीन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

याबाबत माहिती अशी की, गुरुवारी नुरमोहम्म्द खान (वय ३५, रा. कमलानगर) हे आपल्या ज्युपिटर स्कुटी (एमएच ०६ बीएक्स ९१७०) वरून त्यांच्या दोन मुलींना घेऊन जात असताना आरोपी (रा. शिर्कीचाळ नं.२, पेण) याने पुढे चालणाऱ्या एसटीला चुकीच्या बाजूने ओव्हरटेक करून नुरमोहम्मद खान यांच्या गाडीला धडक दिली. या अपघातात नुरमोहम्मद खान हे जखमी झाले असून त्यांच्या दोन मुली किरकोळ जखमी झाल्या आहेत. या प्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास हवालदार दीपक शिंदे करीत आहेत.

# राष्ट्रीय अभिरूप न्यायालय स्पर्धेत आयएलएस लॉ कॉलेज प्रथम



**अलिबाग** : प्रतिनिधी

ॲड. दत्ता पाटील विधी महाविद्यालय आणि अधिवक्ता परिषद, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन अभिरुप न्यायालय स्पर्धेत पुण्याच्या आयएलएस लॉ कॉलेजने विजेतेपद मिळवले, तर ॲड. दत्ता पाटील विधी महाविद्यालयाने उपविजेतेपद मिळवले.

या स्पर्धेचे आयोजन शनिवारी (दि.१६) करण्यात आले होते. अभिरुप न्यायालय स्पर्धेमध्ये महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील १३ महाविद्यालयातील ३९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या स्पर्धेमध्ये दिवाणी आणि फौजदारी स्वरूपाच्या दोन समस्या विद्यार्थ्यांना देण्यात आल्या होत्या. पुण्याच्या आयएलएस लॉ कॉलेजची विजेता कुलकर्णीला उत्तम स्पर्धक अभिवक्ता, कार्तिकेय द्विवेदीने उत्तम संशोधक म्हणून गौरविण्यात आले. उत्तम मेमोरियल हे पारितोषिक लॉर्डस् युनिव्हर्सल कॉलेज ऑफ लॉ गोरेगाव, मुंबई यांनी मिळवले. श्रद्धा वैशंपायन, मैथिली भगत आणि चैतन्य पाटील यांनी ॲड. दत्ता पाटील विधी महाविद्यालयाच्या संघाचे प्रतिनिधित्व केले. विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले, तसेच सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

रायगड जिल्हा आणि सत्र मुख्य न्यायाधीश अजेय राजंदेकर यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, अधिवक्ता परिषद रायगडचे अध्यक्ष ॲड. संतोष पवार, अधिवक्ता परिषद अलिबागचे अध्यक्ष ॲड. अमित देशमुख, ॲड. दत्ता पाटील विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य ॲड. नीलम हजारे, ॲड. रवींद्र ओक या वेळी उपस्थित होते.

प्रा. संदीप घाडगे, प्रा. मनोज धुमाळ, प्रा. समीक्षा म्हात्रे, प्रा. पियुषा पाटील, प्रा. चिन्मय राणे तसेच अधिवक्ता परिषदेचे ॲड. श्रीराम ठोसर, ॲड. अभिजित बागवे, ॲड. निकेत चवरकर, विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या राष्ट्रीय अभिरुप न्यायालय स्पर्धेचे आयोजन यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# मुरूडमध्ये पतसंस्था संचालक, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

**मुरूड** : प्रतिनिधी

प्रगतीशिल महाराष्ट्र राज्यात सहकारी संस्थांचे जाळे पसरले आहे. सहकार कायद्यातील तरतुदींचे योग्य पालन केल्यास पतसंस्थांना आर्थिक स्थैर्य लाभून सहकार चळवळ पुढे नेता येईल, असे प्रतिपादन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था रायगड येथील अधिकारी प्रा. एस. बी. वाटाणे यांनी केले.

मुरूड तालुका नागरी पतसंस्थेतील संचालकांसह कर्मचारी वर्गासाठी आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या वेळी महात्मा फुले पतसंस्थेचे चेअरमन अजित गुरव, उपाध्यक्ष अनिता चौलकर, प्रा. एस. बी. वाटाणे, सहकार भारतीचे जिल्हामंत्री प्रा. मेघराज जाधव, संजय ठाकूर, आदेश दांडेकर आदी उपस्थित होते. प्रशिक्षणार्थींना प्रशस्तीपत्रही देण्यात आले.



# रायगडात होळी सणाची धूम सुरू

## सोंग, पारंपरिक गाणी, बाल्या व माळी नाचाची परंपरा

**पाली** : प्रतिनिधी

बाल्या व माळी नाच हा ग्रामीण पारंपरिक नृत्यप्रकार लुप्त होण्याच्या मार्गावर आहे, मात्र पूर्वजांकडून मिळालेली ही पारंपरिक नाचाची कला जीवंत ठेवण्यासाठी जिल्ह्यातील विविध ठिकाणी होळीला बाल्या व माळी नाच सादर केला जातो.

शिवाय वेगवेगळी सोंग घेऊन लहान मुले धम्माल उडवतात. काही ठिकाणी होळीच्या दोन–तीन दिवस आधी होळीसमोर महिला पारंपरिक गाणी म्हणतात.

रायगड जिल्ह्यात शिमगा, होळी, गणपती, नवरात्र, दसरा व दिवाळी अशा विविध सणांमध्ये गावाखेड्यात पारंपरिक बाल्या व माळी डान्स ही मंडळी अनेक वर्षांपासून आपली पारंपरिक कला सादर करीत आहे. नाचण्याचा विशिष्ट व आकर्षक ठेका व लय, कपड्यांचा वेगळेपणा आणि काळजाला भिडणारी पारंपरिक, प्रबोधनात्मक गाणी व संगीत यामुळे अनेक वर्षांपासून बाल्या व माळी डान्स लोकप्रिय होता.

### मनोरंजन अन् एकोपा

*होळीला गावागावांत सोंग काढले जाते. निखळ मनोरंजन करणे हा त्यामागील मुख्य उद्देश आहे. यातून गावातील एकोपादेखील साधला जातो. लहान मुले यामध्ये सहभागी होतात. काही गावातील महिला होळी जवळ येऊन गाणी म्हणतात त्याला काही ठिकाणी मालणी असे म्हणतात. ही गाणी विशेष तालासुरात म्हटली जातात. स्थानिक भाषा व परिस्थितीचा यामध्ये समावेश व उल्लेख असतो.*

आपल्या पुर्वजांची ही कला टिकावी, तिचे जतन व्हावे यासाठी पेण तालुक्यातील दुरशेत गावातील सुशिक्षीत तरुण मागील दहा वर्षांपासून स्वतः ही कला सादर करुन जोपासत आहेत. यातील अनेक तरुण पदवीधर आहेत तर कोणी इंजिनियरदेखिल आहेत, मात्र प्रत्येकजण तनमनधनाने कोणताही संकोच न बाळगता ही कला सादर करतात व त्यासाठी मेहनत घेत आहेत. त्यांच्या कलेबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**आपल्या भावी पिढीला ही कला समजावी व त्यांनीदेखील ही पारंपरिक कला अधिक समृद्ध करावी यासाठी आपली वैयक्तिक जबाबदारी म्हणून मागील १५ वर्षांपासून बाल्या व माळी नाच ही कला जतन करीत आहोत. गावातील सर्व ग्रामस्त आम्हाला प्रोत्साहन देवून सहकार्य करतात. पारंपरिक कला टिकावी यासाठी आमचा हा छोटासा प्रयत्न आहे.**

**–समाधान म्हात्रे, तरुण कलाकार, दुरशेत,**





# चौल येथे आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**रेवदंडा** : प्रतिनिधी

चौल श्री रामेश्वर येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीरास मोठा प्रतिसाद गरजू व रूग्णांचा लाभला. एमडी ग्रुपच्या वतीने चौल श्री रामेश्वर मंदिरात गुरुवारी (दि.१४) जेएसडब्लू संजिवनी मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल व आणि शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना यांचे संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिर झाले.

या शिबिरास माजी जि. प. प्रतोद मानसी दळवी, शिवसेना महिला आघाडी प्रमुख संजिवनी नाईक, रेवदंडा सरपंच प्रफुल्ल मोरे, चौल ज्येष्ठ कार्यकर्ते प्रवीण राउत, नागाव ग्रा. पं. सदस्य अंकिता शेवडे, शिवसेना कार्यकर्ते प्रसाद गोंधळी, शिवसेना महिला विभाग प्रमुख तनुजा घरत, चौल माजी सरपंच अश्विनी राउत, सदस्य जयवंत नागवेकर, भाजपचे विश्वास जोशी, संकेत जोशी, रेवदंडा ज्येष्ठ कार्यकर्ते हर्षल घरत, डॉ. केदार ओक, ज्येष्ठ कार्यकर्ते शैलेश चव्हाण, ज्योती मुंबईकर, प्रसाद पिंगळे, विजय मुंबईकर, सिद्धेश शेणवईकर, प्रशांत शेणवईकर, आशिष कंटक, निखिल राऊत, प्रशांत जाधव, जितेंद्र जाधव, भूषण घरत आदी प्रमुख कार्यकर्ते व चौल ग्रामस्थ यांची उपस्थिती होती.

डॉ. केतकी तरे, डॉ. श्रद्धा शिंदे, ऑप्टिकल प्रणिता कुंठे, मार्केटींग विनित पाटील, मयुरी मुंबईकर, अनामिका कोलेकर, रूग्ण वाहिका चालक कल्पेश मोकल, विनेश पाटील आदींचे विशेष सहकार्य व परिश्रम या आरोग्य शिबिरास लाभले. या आरोग्य शिबिराचा दोनशेपेक्षा जास्त गरजूंनी लाभ घेतला.

# संपूर्ण आयपीएल भारतातच होणार!



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकांमुळे इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) १७व्या हंगामाच्या दुसऱ्या टप्प्यातील सामने संयुक्त अरब अमिराती येथे खेळवण्यात येऊ शकतील अशी चर्चा सुरू होती, मात्र आयपीएलचे अध्यक्ष अरुण धुमल यांनी या चर्चांना पूर्णविराम देताना संपूर्ण स्पर्धा भारतातच होणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

विश्वातील सर्वांत लोकप्रिय ट्वेन्टी-२० स्पर्धा अशा ख्याती असलेल्या आयपीएलच्या आगामी हंगामाला २२ मार्चपासून प्रारंभ होणार आहे. सलामीच्या लढतीत महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखालील गतविजेत्या चेन्नई सुपर किंग्ज संघासमोर विराट कोहलीचा समावेश असलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुचे आव्हान असेल. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) काही दिवसांपूर्वीच आयपीएलच्या आगामी हंगामातील पहिल्या केवळ १७ दिवसांचेच वेळापत्रक जाहीर केले होते.

उर्वरित वेळापत्रक हे लोकसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यानंतर निश्चित केले जाईल, असे त्या वेळी 'बीसीसीआय'कडून सांगण्यात आले होते. लोकसभा निवडणुकीची केंद्रीय निवडणूक आयोगाने शनिवारी घोषणा केली. १९ एप्रिल ते १ जून या कालावधीत ५४३ लोकसभा मतदारसंघांसाठी सात टप्प्यांमध्ये मतदान होणार आहे. 'बीसीसीआय'ने यापूर्वीच २२ मार्च ते ७ एप्रिल या १७ दिवसांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. या कालावधीत २१ सामने खेळवले जाणार आहेत. यानंतरचे सामनेही भारतातच होणार असल्याची माहिती अरुण धुमल यांच्याकडून देण्यात आली.

लोकसभा निवडणुकांचा आयपीएलवर परिणाम झाल्याचे यापूर्वी पाहायला मिळाले होते. २००९मध्ये लोकसभा निवडणुकांच्या कारणास्तव आयपीएलचा संपूर्ण हंगाम दक्षिण आफ्रिकेत खेळवण्यात आला होता. आयपीएल भारताबाहेर होण्याची ही पहिलीच वेळ होती. त्यानंतर २०१४मध्ये निवडणुकांमुळेच सुरुवातीच्या २० सामन्यांचे आयोजन अमिरातीत करण्यात आले होते. २०१९मध्ये मात्र लोकसभा निवडणुका असतानाही संपूर्ण आयपीएल स्पर्धा भारतातच झाली होती. यंदाही सर्व सामने भारतात होणार असल्याचे धुमल यांनी सांगितले.

'आम्ही लवकरच उर्वरित सामन्यांचे वेळापत्रक जाहीर करू, आयपीएल भारताबाहेर हलविण्यात येणार नाही हे नक्की,' असे धुमल यांनी स्पष्ट केले तसेच बीसीसीआयचे सचिव जय शहा यांनीही यापूर्वी लोकसभा निवडणुकांचा आयपीएल आयोजनावर परिणाम होणार नसल्याचे नमूद केले होते.

### शक्यतांना पूर्णविराम

काही आयपीएल संघांनी आपल्या खेळाडूंना त्यांचे पारपत्र आपल्याकडे सूपूर्द करण्याची सूचना केल्याची माहिती देण्यात येत होती. त्यामुळे यंदा दुसऱ्या टप्प्यातील सामने भारताबाहेर होऊ शकतील अशी चर्चा सुरू झाली होती. यापूर्वी कोरोना प्रादुर्भावाच्या कारणास्तव २०२०मध्ये पूर्ण स्पर्धा आणि २०२१मध्ये आयपीएलचे दुसऱ्या टप्प्यातील सामने अमिरातीत खेळवण्यात आले होते. त्यामुळे यंदाही अमिराती किंवा केवळ दुबईचा विचार केला जाऊ शकेल असे म्हटले जात होते, मात्र धुमल यांनी शक्यता, चर्चांना पूर्णविराम दिला आहे.

# अलिबागच्या कुरूळमध्ये भंडारी प्रीमिअर लीग

**अलिबाग : प्रतिनिधी**

हिंदू भंडारी सेवाभावी संस्था पुरस्कृत समस्त भंडारी समाजाच्या सहकार्याने अलिबाग तालुस्तरीय टेनिस क्रिकेट भंडारी प्रीमिअर लीगचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी (दि.१६) कुरूळ येथील आझाद मैदानात मोठ्या जल्लोषात झाले.

सासवणे ग्रामपंचायतीच्या सदस्य नयना शिलदणकर यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन समारंभास भंडारी समाजाचे ज्येष्ठ नेते नरहरी धनाजी तथा तोडणकर, अलिबागच्या माजी नगरसेविका संजना किर, अखिल भंडारी सेवा मंडळ पनवेलचे अध्यक्ष डॉ. दीपक खोत, राजेश शिंदे, अविनाश आचरेकर, प्रवीण पाटील, प्रमोद तोडणकर, तुकाराम तोडणकर, किशोर तोडणकर, पत्रकार भारत रांजणकर, भूषण बिर्जे, अभिनेत्री विजया कुडव, साहिल पाटील, नितीन देशमुख, प्रसाद नागवेकर यांच्यासह पदाधिकारी, खेळाडू उपस्थित होते.

या स्पर्धेत आर. के. ब्रदर्स, स्पृहा इलेव्हन किहीम, बिर्जे ब्रदर्स कुरूळ, रायगड लिफ्ट, जय हनुमान कातळपाडा, संस्कृत इलेव्हन वाडगाव, कनगुटकर इलेव्हन कालोशी, बाबू शिलधनकर, सासवणे इलेव्हन हे आठ संघ सहभागी झाले आहेत. उद्घाटनीय सामना बाबू शिलधनकर, सासवणे इलेव्हन व कनगुटकर इलेव्हन कालोशी या संघामध्ये झाला. यामध्ये सासवणे संघ जिंकला. यानंतर अन्य सामने खेळले गेले.



# कर्जतमध्ये राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेचा शुभारंभ; खेळाडूंचा प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशन आयोजित कोकण ज्ञानपीठ अभियांत्रिकी महाविद्यालय व पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेचा कर्जतमध्ये शुभारंभ करण्यात आला. या स्पर्धेत एकूण २२५ स्पर्धकांनी सहभाग घेतला आहे.

अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून कामगार नेते महेंद्र घरत यांच्या हस्ते उद्घाटन झाले. उद्घाटन समारंभास शिवसेनेचे कर्जत-खालापूर विधानसभा प्रमुख प्रसाद थोरवे, पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश वेदक, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, सचिव अरुण पाटकर, सहसचिव सचिन भालेराव, सदस्य सुभाष टेंबे, संदीप पाटकर, प्राचार्य डॉ. विलास पिल्लेवान आदी उपस्थित होते. गिरीश वेदक यांनी उपस्थितांचे स्वागत केले.



या वेळी प्रा. राजकुमार नारखेडे, प्रा. संजय पाटील, प्रा. शब्बीर कर्जतवाला, प्रा. विजय खरचे, प्रा. विकास पाटील, प्रा. सुनील सोनार, संजय लाड, वाहिद शेख, किरण पाटील, सुनील लाड, अनिल घरत, मंगेश वझरेकर, निश्चल शिंदे, सचिन मनवे, गजानन लाड आदींसह शिक्षक, विद्यार्थी व क्रीडारसिक उपस्थित होते. यानंतर खेळाडूंनी दमदार खेळाचे प्रदर्शन घडविले.

# दिलशान सुरुवातीच्या सामन्यांना मुकणार

## मुंबई संघाला धक्का!



**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२४ सुरू होण्यासाठी काही दिवस शिल्लक असताना मुंबई इंडियन्स संघाला मोठा धक्का बसला आहे. श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज दिलशान मदुशंका आयपीएलचे सुरुवातीचे काही सामने खेळू शकणार नाही. खुद्द श्रीलंका क्रिकेट बोर्डाने ही माहिती दिली.

बांगलादेशविरुद्धच्या दुसऱ्या वनडेदरम्यान हा वेगवान गोलंदाज जखमी झाला होता. त्यामुळे तो तिसऱ्या सामन्यातूनही बाहेर पडला आहे. मुंबई इंडियन्सचा संघ आयपीएल २०२४मध्ये पहिला सामना २४ मार्च रोजी गुजरात टायटन्सविरुद्ध खेळणार आहे.

# कुमार गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राची बाद फेरीत धडक

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या मुलांनी साखळी सामन्यात सलग दोन विजय मिळवित ३३व्या किशोर गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेच्या बाद फेरीत धडक दिली. बिहार मोतीहारी येथे सुरू असलेल्या या राष्ट्रीय स्पर्धेत रविवारी रात्री उशिरा झालेल्या क गटात महाराष्ट्राने प्रथम गुजरातला ४१-२४ असे पराभूत करीत विजयी सलामी दिली.

विश्रांतीला २१-१४ अशी छोटी आघाडी घेणाऱ्या महाराष्ट्राने विश्रांतीनंतर आपला खेळ थोडा गतिमान करीत १७ गुणांच्या फरकाने सामना खिशात टाकला. संघनायक सोपान पुणेकरच्या झंझावाती चढाया त्याला रवींद्र माने याची पकडीची मिळालेली भक्कम साथ यामुळे हा विजय शक्य झाला.



यानंतर रविवारी सकाळी झालेल्या शेवटच्या साखळी सामन्यात महाराष्ट्राने दुबळ्या त्रिपुराला २७-०४ असे सहज नमवित बाद फेरी गाठली. महाराष्ट्राच्या या क गटात फक्त तीन संघाचा समावेश होता. पहिल्या डावात १५-०१ अशी भक्कम आघाडी घेणाऱ्या महाराष्ट्राने दुसऱ्या डावात सावध खेळ करीत आपला विजय सोपा केला. अथर्व सोनावणे याच्या दमदार चढाया, सूरज झगडेचा भक्कम बचाव यामुळे हे शक्य झाले. उपउपांत्यपूर्व फेरीत महाराष्ट्राची गाठ आता फ गटातील उपविजेत्या संघाशी पडेल.

# आयपीएलपूर्वी विराट भारतात दाखल

**मुंबई** : भारतीय संघाचा स्टार फलंदाज विराट कोहली आयपीएल २०२४मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघाकडून खेळण्यासाठी सज्ज झाला आहे. जवळपास दोन महिने लंडनमध्ये घालवल्यानंतर विराट अखेर पत्नी अनुष्का शर्मासोबत भारतात परतला.



नुकतेच विराट कोहलीची पत्नी अनुष्का शर्माने दुसऱ्या मुलाला जन्म दिला आहे. विराट आणि अनुष्का यांनी त्यांच्या मुलाचे नाव अकाय ठेवले आहे. विराट कोहली भारतात परतल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. विराटने अलीकडेच इंग्लंडविरुद्ध खेळल्या गेलेल्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतून ब्रेक घेतला होता. विराट हा पत्नी अनुष्काबरोबर लंडनमध्ये त्यांच्या दुसऱ्या मुलाच्या जन्मासाठी उपस्थित होता. अनुष्काने फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात मुलगा अकायला जन्म दिला. याची माहिती खुद्द विराटने सोशल मीडियावर दिली होती. आता विराट आपली कौटुंबिक जबाबदारी पार पाडून भारतात परतला आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com